नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक १० * * चंद्रपूर * गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हवाई दलाचे फायटर जेट क्रॅश : दोघांचा मृत्यू

**■ वृत्तसंस्था, चुरू (राजस्थान), दि. ९ :**
राजस्थानमधील चुरू येथे भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळले आहे. वृत्तसंस्था एएनआयनुसार, हे जग्वार लढाऊ विमान आहे. या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी लढाऊ विमानासारखे दिसणारे अवशेष विखुरलेले आहेत.

चुरूचे एसपी जय यादव म्हणाले की, राजलदेसर पोलीस स्टेशन परिसरातील भानुदा गावात विमान अपघात झाला आहे. यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे. राजलदेसर पोलीस घटनास्थळी पाठवण्यात आले आहेत. ढिगाऱ्याजवळ गंभीरपणे जळालेल्या झालेल्या मृतदेहांचे तुकडे आढळले आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## विदर्भावर जलात्कार

गेल्या चार दिवसांपासून सर्वत्र पावसाने हाहाकार उडवून टाकला आहे. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे यंदा १००% पेक्षा जास्त पाऊस पडणार आहे. पण पाऊस वेळेनुसार आणि प्रमाणबद्ध रीतीने पडला नाही आणि सतत चार दिवस जबरदस्त पाऊस झाला. तर केवळ शेतीचे, शेत पिकांचेच नाही तर नागरिकांचेही आणि नागरी वस्त्यांचेही बरेच नुकसान होत असते. आता प्रत्येक शहरात सिमेंटचे रस्ते बांधण्यात आले आहेत. जोरदार अतिवृष्टी झाली तर पाणी तुंबते. काही वर्षांपूर्वीच्या जुन्या इमारती आणि घरे ज्या पातळीवर बांधण्यात आलेली आहे. त्यापेक्षा सिमेंटचे रस्ते बऱ्याच ठिकाणी बरेच उंच झालेले आहेत. त्यामुळे जास्त पाऊस पडल्यावर घरासमोर तुडुंब पाणी साचते. कधी कधी ते घरादारात शिरते, इमारतींमध्ये शिरते. हेच शिरलेले पाणी व्यवस्थित असलेल्या संसारांना आणि घरादारांना भिजवून जाते. तसेच शेतकऱ्यांच्या शेतातल्या पिकांना कुजवून जाते. मग अशा आसमानी संकटाला आणि अत्याचाराला जलात्कारच म्हणावे लागेल. शेतीच्या बाबतीत विचार केल्यास जेव्हा शेतकऱ्यांना गरज असते. तेव्हा अजिबात पाऊस येत नाही. त्यानंतर गरज नसताना जो पाऊस येतो. त्यामुळे शेतीचे आणि शेत पिकांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होते. बाल्यावस्थेतील रोपटी पावसामुळे पार कुजून जातात. शेतकऱ्यांना अशावेळी रडत बसण्याशिवाय दुसरे काहीच करता येत नाही. त्यातच महागड्या भावाचे बी-बियाणे, त्यापेक्षा महाग असलेली शेतमजुरांची शेतमजुरी, त्यावर ताण म्हणजे कीटकनाशके आणि खते या चक्रव्यूहात बेजार झालेला शेतकरी असहाय्य बनलेला आहे. गेल्या चार दिवसांपासून भंडारा शहर जे गोसीखुर्दच्या कक्षेत येते. ते संपूर्ण पाण्यात बुडलेले आहे. मागील महिन्यात पावसाने मुंबई, पुणे, नाशिकसह खोपोली, रायगड वगैरे भागांमध्ये आपले रौद्ररूप दाखवले. आता लहर फिरली आणि पावसाने आपला कहर दाखवण्यासाठी आता विदर्भाकडे मोर्चा वळवला आहे. खरे तर पावसाच्या लहरी स्वभावाला आपणच जबाबदार आहोत. विकासाच्या नावाखाली आपण लाखो झाडांची कत्तल केलेली आहे. आपण शंभर मोठमोठी झाडे विकासाच्या नावाखाली कापतो आणि वृक्ष लागवडीच्या नावाखाली काही लहानलहान रोपटी लावतो. त्यामधील अर्धी रोपटी उन्हाळ्यात सुकून जातात. या ठिकाणी अत्यंत वस्तुनिष्ठ प्रश्न विचारावासा वाटतो. तो म्हणजे, दोन-दोन वर्षांच्या दहा मुली, वीस वर्षाच्या एका तरुण मुलीची बरोबरी करू शकतील काय. तुमच्या मनातील या प्रश्नाचे उत्तर आणि विचारण्याचे प्रयोजन सर्व सुज्ञांना कळले असेलच. विकासापोटी विदर्भातील अनेक घनदाट जंगले आपण विरळ करून टाकलेली आहेत. चंद्रपूर काय, गडचिरोली काय किंवा महाराष्ट्रातील इतर जंगले काय सर्वांचे आजचे जे काही हाल झाले आहेत. ते अजिबात बघवत नाहीत. नद्यांमधील वाळू चोरूनचोरून नद्यांना ओसाड करून टाकले आहे. त्यामुळे बारमाही वाहणाऱ्या नद्या हल्ली चार-दोन महिनेच वाहत असतात. भारतातील ९०% जनता नद्यांच्या काठावर वसलेली आहे त्यांना सध्याच्या घडीला पिण्याचे शुद्ध पाणीही बारा महिने मिळू शकत नाही. या अशा प्रकारच्या कारणांमुळे जनतेला किती त्रास भोगावा लागतो. हे जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे, विदभार्तील हा जलात्कार म्हणजे नियतीने दिलेला एक इशारा समजला पाहिजे. आपण प्रगती बरीच केली आहे. पण अजूनही आपल्याकडे शहाणपण आले नाही. त्याचाच हा परिपाक म्हणावा लागेल.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पूर्व विदर्भात कोसळधार

# पावसाचे ४ बळी!





**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :**
गेल्या तीन दिवसांपासून बुधवारच्या दुपारपर्यंत धुमाकूळ घालणाऱ्या मुसळधार पावसाने पूर्व विदर्भात प्रचंड दाणादाण उडवली असून, चौघांचा बळी गेला आहे. या पावसाने अनेक पाळीव जनावरांचाही मृत्यू झाला असून, घरादारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

रविवारी पहाटेपासूनच पावसाला सुरूवात होवून बुधवारच्या दुपारपर्यंत संततधार पावसाने हजेरी लावली. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात दमदार पावसामुळे नदीनाले फुगले असून, मंगळवार रात्रीच्या पावसाने तर पार दाणादाण उडवली.

भंडारा जिल्ह्यातील गोसे धरणाचे सर्व दरवाजे उघडण्यात आले असून, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पावसाने नागपूर शहराची पार दैना झाली. अनेक रस्ते जलमय झाल्याचे दिसून आले. सखल भागातील अनेक घरात पाणी शिरले.

दरम्यान, नागपूर नजिकच्या उप्पलवाडी येथील १८ वर्षे वयाचा कार्तिक शिवशंकर लाडपे या युवकाचा नाल्याचा प्रवाहात वाहून मृत्यू झाला. कळमेश्वर तालुक्यातील बोरगाव येथील अनिल हनुमान पानपत्ते (३५) हा इसम नाल्याच्या प्रवाहात वाहून गेला असून त्याचा शोध सुरु आहे.

मुसळधार पावसामुळे कामठी, नागपूर, नरखेड, सावनेर, रामटेक, पारशिवनी, भिवापूर, उमरेड, कुही तालुक्यातील एकूण ११ जनावरे मृत झालीत तर २ जनावरे जखमी आहेत. सुमारे ४५३ घरांचे अंशतः तर ४ घरांचे पूर्णतः नुकसान झाले.

### कारवर झाड कोसळून दोघांचा मृत्यू

**गोंदिया :** रस्त्याच्या कडे वरील झाड पुन्हा एकदा वाटसरूंसाठी कर्दनकाळ ठरले. धावत्या मारुती कारवर झाड पडल्यामुळे अपघात घडून दोघांचा जागीच मृत्यू झाला तर चौघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवार ९ जुलै रोजी सकाळी ९ ते ९.३० वाजताच्या सुमारास गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी येथे कोहमारा-गोंदिया मार्गावरील पेट्रोलपंप परिसरात घडली. वासुदेव खेडकर व आनंदराव राऊत अशी या अपघातातील मृतांची नावे आहेत.

कोहमाराच्या दिशेने जात असलेल्या मारुती ओमनी कारवर रस्त्याच्या कडेवरील आंब्याचे झाड पावसामुळे कोलमडून पडल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर चालक गंभीर जखमी झाला आहे. कारवर झाड



कोसळताच मागून येत असलेल्या टोयोटा कार चालकाचा स्टेअरिंगवरून नियंत्रण सुटल्याने ती कारही रस्त्याच्या शेजारील दुसऱ्या झाडावर धडकली. ज्यामध्ये त्या कार मधील चालकासह तिघेजण गंभीर जखमी झाले.

## पूर्व विदर्भातील पूरस्थिती नियंत्रणात : मुख्यमंत्री

पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे पूर्व विदर्भात पूरस्थिती निर्माण झाली आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) सज्ज आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी यासंदर्भात सभागृहात विषय मांडला होता. पावसामुळे नागपूर तसेच विदर्भात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी नाना पटोले यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पूरस्थितीमुळे काही प्रवासी एस.टी.मध्ये अडकले होते. त्यांना जवळच्या शाळेत स्थलांतरित करण्यात आले होते. त्यानंतर सर्व प्रवाशांना सुखरूपपणे घरी पाठवण्यात आले आहे.

गडचिरोली ते नागपूर (आरमोरी) मार्ग बंद असून, पर्यायी मार्गावर वाहतूक सुरळीत सुरू आहे. गोसीखुर्द धरणातून पाणी सोडण्यात आल्यामुळे गडचिरोलीपर्यंत सर्व नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नागपूर शहरातील सखल भागांत पाणी साचले यावर

### एसडीआरएफ आणि एनडीआरए यंत्रणा सज्ज



संबंधित यंत्रणेचे पूर्ण लक्ष आहे. नागरिकांसाठी बचाव कार्य सुरु आहे. या पूरस्थितीत एक व्यक्ती वाहून गेल्याचीही माहिती मिळाली आहे. याठिकाणी एसडीआरएफ आणि एनडीआरए यांना सज्ज ठेवले आहे. आजही नागपूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट असल्याने संबंधित यंत्रणांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी असे, आवाहन फडणवीस यांनी केले आहे.

## फडणवीसांनी टोचले गायकवाडांचे कान

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
आमदार निवासमधील कॅन्टीन कर्मचाऱ्याने निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी थेट कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केली. आमदारांना अशा पद्धतीने जेवण देत असेल तर सर्वसामान्य नागरिकांना कशा पद्धतीने जेवण मिळत असेल? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या या कृतीवर विधानपरिषदेत विरोधकांनी आक्षेप घेतला.

फडणवीस म्हणाले, आमदार निवासात काही घाण असेल किंवा चुकीच्या काही गोष्टी असतील तर स्वतंत्रपणे त्यावर कारवाई करावी. पण लोकप्रतिनिधींनी मारहाण करणे हे चुकीचे आहे. त्यांनी जे केले ते चुकीचेच आहे. यामुळे आमदारांबद्दल लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो. आपण कुठेतरी सत्तेचा गैरवापर करतो, अशा प्रकारची भावना लोकांमध्ये जाते. निश्चितपणे ही गंभीर बाब आहे आणि यावर जी काही कारवाई करायची असेल ती करण्यात यावी.

कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्या संजय गायकवाड यांचे निलंबन करा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे आमदार अनिल परब यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. आमदाराने कसं रहावं? बनियन, टॉवेल, लुंगीवर आमदार येतो. तुम्ही रस्त्यावर राहताय का, असा सवाल त्यांनी केली. कर्मचाऱ्यांना मारता. तुमच्या हिंमत असेल, तर मंत्र्यांना मारा, अशा लोकांचा तुम्ही पाठिंबा घेणार का, असा सवाल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केला. तेव्हा फडणवीस म्हणाले की, लोकप्रतिनिधींनी मारहाण करणे योग्य नाही. त्यामुळे लोकांत चुकीचा संदेश जातो. या प्रकरणी सभापतींनी काय कारवाई करता येईल, याचा निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.

नाना पटोले म्हणाले की, कायदा हातात घेण्याची परंपरा या सरकारने सुरू केली आहे. या माजाच्या कृत्याने राज्यात दहशत निर्माण करण्याचे काम सुरू केले आहे. या गोष्टीचा आम्ही निषेध करतो असे म्हणत आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीबद्दल पटोलेंनी सरकारवर निशाणा साधला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी नंतर आमदार संजय गायकवाड यांचे कान उपटल्याची माहिती आहे.

## १३ ऑगस्टपर्यंत वाढली तहव्वूरची न्यायालयीन कोठडी



**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :**
दिल्लीच्या एनआयए न्यायालयाने २६/११ मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा याची न्यायालयीन कोठडी १३ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. दरम्यान, राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बुधवारी राणाविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. न्यायालय १३ ऑगस्ट रोजी या आरोपपत्रावर सुनावणी करणार आहे. राणाविरुद्ध हे दुसरे आरोपपत्र आहे. यापूर्वी पहिले आरोपपत्र २०११ मध्ये दाखल करण्यात आले होते. यामध्ये एनआयएने राणाला डेव्हिड हेडली आणि इतर दहशतवाद्यांसह २६/११ हल्ल्याचा कट रचणारा म्हणून वर्णन केले होते.

यापूर्वी ७ जुलै रोजी एनआयएने केलेल्या चौकशीत राणाने मुंबई हल्ल्याच्या वेळी मुंबईत असल्याचे आणि पाकिस्तानी एजंट असल्याचे कबूल केले होते. तसेच हल्ला घडवून आणण्यात मदत केल्याचेही त्याने कबूल केले होते. तहव्वुरला ऑक्टोबर २००९ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे अमेरिकन एजन्सी एफबीआयने अटक केली होती.

## तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा

### कायमस्वरूपी रद्दबातल करण्याच्या दिशेने सरकारची पावले

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
राज्यातील लाखो नागरिकांसाठी दिलासादायक आणि ऐतिहासिक निर्णय घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा केली आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत नागरी क्षेत्रांमध्ये झालेले सर्व तुकडे कायदेशीर ठरवण्यासाठी १५ दिवसांत एसओपी जाहीर केली जाणार आहे, असे बावनकुळे यांनी विधानसभेत जाहीर केले. भविष्यात हा कायदा कायमस्वरूपी रद्द करण्यासाठीही पावले उचलली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत आमदार अमोल खताळ यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, राज्यात महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम (एमआरटीपी) आणि तुकडेबंदी कायद्यामुळे नागरिकांना नोंदणी, बांधकाम परवाने, मालकी हक्क मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आमदार जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, विक्रम पाचपुते, प्रकाश सोळंके, अभिजीत पाटील यांनीही या मुद्द्यावर सभागृहात आवाज उठवला.

**एसओपीचा आराखडा**

प्लॉटिंग, लेआऊट, रस्ते, रजिस्ट्री, रिअलिस्टिक बांधकामे यासंदभार्तील नियम स्पष्ट केले जाणार

दलालांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी पारदर्शक प्रक्रिया राबवली जाणार

चार सदस्यीय समितीची स्थापना एसीएस महसूल, एसीएस युडी, जमाबंदी आयुक्त आणि आयजीआर या समितीत असणार

**कोणत्या भागांना लाभ?**

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, प्राधिकरण क्षेत्रे तसेच गावठाणालगत २०० ते ५०० मीटर पर्यंतचा भाग या निर्णयात येणार आहे. महानगरपालिकांच्या सीमेलगत २ किमी पर्यंतचा भागही विचारात घेण्यात येणार.

५० लाखांहून अधिक कुटुंबांना याचा लाभ मिळणार आहे

## जुन्या वाहनांना १ नोव्हेंबरपासून मिळणार नाही इंधन

### दिल्लीसह ५ शहरांमध्ये लागू होणार नियम



**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :**
दिल्लीमध्ये एंड-ऑफ-लाइफ किंवा जास्त वयाच्या वाहनांवरील इंधन बंदी १ नोव्हेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. मंगळवारी एअर क्वालिटी कमिशनच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

१० वर्षांपेक्षा जुनी डिझेल वाहने आणि १५ वर्षांपेक्षा जुनी पेट्रोल वाहने यांना ईओएल वाहने म्हणतात. आधी जारी केलेल्या सूचनांनुसार, अशा वाहनांना १ जुलैपासून दिल्लीत इंधन दिले जाणार नव्हते. आता त्यांना ३१ ऑक्टोबरपर्यंत सूट देण्यात आली आहे.

३ जुलै रोजी दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी अशा वाहनांवरील कारवाई थांबवण्याची विनंती एअर क्वालिटी मॅनेजमेंट कमिशनला केली होती.

खरं तर, एप्रिलमध्ये आदेश दिला होता की प्रदूषण कमी करण्यासाठी १ जुलैपासून जुन्या वाहनांमध्ये इंधन भरले जाणार नाही. दिल्ली व्यतिरिक्त, हा नियम गुरुग्राम, फरीदाबाद, नोएडा, गाझियाबाद आणि सोनीपतमध्ये देखील लागू होईल.

दिल्ली सरकारने एअर क्वालिटी कमिशन ला पत्र लिहून जुन्या वाहनांमध्ये इंधन भरण्यावरील बंदी सध्या तरी थांबवण्याचे आवाहन केले आहे. ही माहिती पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी गुरुवारी दिली.

## टोल कंत्राटदाराला नियमबाह्य ३ हजार कोटींचा फायदा

### नाना पटोलेंचा आरोप

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल नाक्यांवर हलक्या वाहनांना व शासकीय बससेवांना टोलमाफी देऊन कंत्राटदाराला नियमबाह्य मुदतवाढ देण्यात आली असून यामुळे राज्याला तब्बल ३ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे नाना पटोले यांनी विधानसभेत केला.

या प्रकरणी त्यांनी मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव आणि एमएसआरडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांविरोधात हक्कभंगाची सूचना सादर केली आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयात ९१०.९२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई नमूद केली असली तरी कंत्राटदाराने आपल्या पत्रात कुठलीही आकडेवारी दिलेली नाही. मंत्रिमंडळाला चुकीची माहिती देऊन खासगी कंपनीला बेकायदेशीर फायदा मिळवून देण्यात आला, असा गंभीर आरोप पटोले यांनी केला. कंत्राट १९ नोव्हेंबर २०२६ रोजी संपल्यानंतर टोल महसूल महामंडळ स्वतः वसूल करू शकते का, याबाबत कोणताही अभ्यास किंवा प्रस्ताव मांडण्यात आलेला नाही, असे ते म्हणाले.

## विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला यश

### अधिवेशन संपल्यानंतर खात्यात पगार : मंत्री गिरीश महाजनांची घोषणा



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
मुंबईतील आझाद मैदानात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे.

शिक्षकांच्या विविध मागण्यांवर तोडगा काढत भाजप नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी आज सरकारनचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनस्थळी भेट दिली आणि सरकारतर्फे सर्व मागण्या मान्य करण्याची घोषणा केली. तसेच अधिवेशन संपल्यानंतर खात्यात पैसे पडतील, असे महाजन यांनी सांगितले.

राज्यातील सुमारे ५००० खासगी विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने शासकीय अनुदान देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मधील विधानमंडळ अधिवेशनात घेण्यात आला होता. मात्र, त्या निर्णयाला आता दहा महिने उलटूनही प्रत्यक्ष निधीच्या तरतुदीचा कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या शाळांमधील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, सरकारच्या दिरंगाईविरोधात आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात हे आंदोलन सुरू होते.

गिरीश महाजन म्हणाले की, आमची भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी ही आहे, त्यामुळे अतिशय धाडसी निर्णय फडणवीसांनी त्यावेळी घेतला. त्यानुसार, २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के दिले.

सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. तुम्ही याबाबत वारंवार मागणी करत होता. पण आता तुमचा पगारा प्रश्न मार्गी लागलेला आहे. आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे, असे गिरीश महाजन म्हणाले.

याबाबत तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत ठरले आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन येत्या १८ तारखेला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील. यात कोणताही बदल होणार नाही, अशी ग्वाही गिरीश महाजन यांनी आंदोलक विनाअनुदानित शिक्षकांना दिली.

**शेवटपर्यंत नियमित पगार मिळेल**

मी कुठुनही काढेन, काहीही करेन पण तुमच्या खात्यात केवळ एका महिन्यापुरता नाही, तर हा पगार आता शेवटपर्यंत नियमितपणे मिळेल. ठरलेल्या टप्प्याप्रमाणे जो काही पगार असेल, तो तुमच्या खात्यात जमा केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. हा त्यांचा शब्द आहे, असेही गिरीश महाजन म्हणाले.

**५८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा**

दरम्यान, राज्यामध्ये सध्या ५८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा आहेत. यामध्ये ८२० प्राथमिक, १९८४ माध्यमिक व ३०४० उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण ३५१३ प्राथमिक, २३८० माध्यमिक व ३०४३ उच्च माध्यमिक तुकड्या कार्यरत आहेत. एकूण ८६०२ प्राथमिक शिक्षक,२४०२८ माध्यमिक शिक्षक आणि १६९३२ उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.



# विधीमंडळ अधिवेशन

## गिरणी कामगारांना मुंबईतच घर द्या!

### जयंत पाटील यांची विधानसभेत मागणी



**मुंबई :** मुंबईतील गिरणी कामगारांना मुंबईपासून दूर शेलू व वांगणी येथे पाठवण्याच्या निर्णयाला जोरदार विरोध करत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार पक्ष) चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज विधानसभेत सरकारला जाब विचारला.

गिरणी कामगारांना त्यांच्याच मायमुंबईत घर द्या, अशी ठाम मागणी करताना त्यांनी सांगितले की, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नांवर संभ्रमावस्था आणि असंतोष वाढत आहे. या पार्श्वभूमीवर १४ कामगार संघटना एकत्र येऊन वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानापासून लाँग मार्च काढत आहेत.

जयंत पाटील यांनी यावेळी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात म्हाडाच्या सहयोगाने गिरणी कामगारांसाठी घरे देण्याची योजना तयार झाली होती. त्या योजनेंतर्गत मुंबईतच घरे देण्याचे ठरले होते. २५ एप्रिल २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या मागणीला सहमती दर्शविली होती. मुंबईतच सुमारे ७६ एकर जागा उपलब्ध असून, त्याचा उपयोग गिरणी कामगारांसाठीच करावा, अशी मागणी त्यांनी पुन्हा केली. पाटील पुढे म्हणाले, शासनाने शेलू- वांगणीला घरे नाकारल्यास कामगारांचा घराचा हक्क राहणार नाही, असा अध्यादेश १५ मार्च २०२४ रोजी काढला. हा कुठला न्याय आहे? गिरणी कामगारांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणारा हा जाचक निर्णय तातडीने रद्द करावा.

कामगारांनी सरकारच्या भूमिकेला पूर्णपणे विरोध दर्शविला असून, शेलू-वांगणीला पाठवून गिरणी कामगारांचा मुंबईशी असलेला जोडाच तोडला जातो आहे, असा आरोप जयंत पाटील यांनी केला. यासोबतच, गिरणी कामगारांना मुंबईतच घरे मिळावीत यासाठी विविध पयार्यांची चाचपणी करून ठोस निर्णय घ्या, असे आवाहन करत त्यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला.

## दिव्यांग संस्थांच्या कर्मचाऱ्यांना दिलासा

**मुंबई :** राज्यातील दिव्यांगांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांच्या उपक्रमांना १०० टक्के अनुदान देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे संकेत दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिले.

सदस्य नरेंद्र भोंडेकर यांच्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली. चर्चेत सदस्य अतुल भातखळकर, जयंत पाटील यांनीही भाग घेत उपप्रश्न विचारले. मंत्री अतुल सावे म्हणाले, १२ मार्च २०१५ च्या मंत्रिमंडळ बैठकीत विनाअनुदान तत्त्वावरील उपक्रमांना काही अटी-शर्तींवर १००% अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

यामध्ये पात्र ठरलेल्या १२१ उपक्रमांच्या २,४६४ पदांना ५०% वेतन अनुदान मंजूर करण्यात आले आहे. मात्र, या प्रस्तावातील काही त्रुटींमुळे तो वित्त विभागाकडून परत आला असून, सर्व त्रुटी दूर करून शासन सकारात्मक भूमिका घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी दिव्यांग कल्याण विभागाचे स्वतंत्र कार्यालय ३६ जिल्ह्यात सुरू करण्याची घोषणा करताना, सावे म्हणाले, संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींशी बैठक घेऊन लवकरच निर्णय घेतला जाईल.

## दूध महासंघात कोट्यवधींचा गैरव्यवहार दोषींवर कठोर कारवाईचे संकेत

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघातील भविष्य निर्वाह निधी गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी आता थेट सीबीआयकडे सोपवण्यात आली असून, दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याची माहिती दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य चेतन तुपे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यांना उत्तर देताना मंत्री सावे म्हणाले, वरिष्ठ सामाजिक सुरक्षा अधिकारी आणि दोन कर्मचाऱ्यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून निधीचा गैरवापर केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणाचा संबंध भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भविष्य निर्वाह निधी कार्यालयाशी असल्याने, १८ मार्च २०२५ रोजी सीबीआयच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेकडे (मुंबई) अधिकृत एफआयआर दाखल करण्यात आली, अशी माहितीही त्यांनी दिली. या चर्चेत सदस्य अभिजीत पाटील आणि सुलभा खोडके यांनीही उपप्रश्न उपस्थित करत, गैरव्यवहार झाल्यामुळे हजारो कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे अधोरेखित केले.

## बोगस प्लॉटच्या खरेदी विक्रीच्या तपासासाठी समिती नेमण्यात यावी- अनुराधा चव्हाण

**मुंबई :** फुलंब्री मतदारसंघात स्वप्नातील घरे करून देण्याचे आमिष दाखवून अनेकांचे घर उद्ध्वस्त झाली आहेत. उपविभागीय अधिकारी यांच्या बनावट एनएचा लेआउट मंजूर असल्याचे होर्डींग्स लाऊन प्लॉट विक्री करण्यात आल्याचा मुद्दा आ. अनुराधा चव्हाण यांनी उपस्थित केला

उपविभागीय अधिकारी कार्यालयात संबंधित प्लॉट धारकांची रजिस्ट्री व नोंदी नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी लेखी दिलेले होते. चुकीचे सात बारा दाखवून मध्यमवर्गीय लोकांना फसवण्यात आले होते. वारंवार चुकीची माहिती देण्यात येत आहे. बोगस प्लॉटच्या खरेदी विक्रीच्या तपासासाठी समिती नेमण्यात यावी. तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला आ. गायकवाड यांची मारहाण

### सभागृहात विरोधकांकडून प्रश्नचिन्ह : कारवाई करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:**

आमदार निवासमधील कॅन्टीन कर्मचाऱ्याने निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे शिवसेना शिडणे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केली.

आमदारांना अशा पद्धतीने जेवण देत असेल तर सर्वसामान्य नागरिकांना कशा पद्धतीने जेवण मिळत असेल? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या या कृतीवर विधानपरिषदेत विरोधकांनी आक्षेप घेतला. तसेच यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील कारवाईचे आदेश दिले आहेत.

विधानपरिषदेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमदार निवासात काही घाण असेल किंवा चुकीच्या काही गोष्टी असतील तर स्वतंत्रपणे त्यावर कारवाई करावी. पण लोकप्रतिनिधींनी मारहाण करणे हे चुकीचे आहे. त्यांनी जे केले ते चुकीचेच आहे. यामुळे आमदारांबद्दल लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो.

आपण कुठेतरी सत्तेचा गैरवापर करतो, अशा प्रकारची भावना लोकांमध्ये जाते. निश्चितपणे ही गंभीर बाब आहे आणि यावर जी काही कारवाई करायची असेल ती करण्यात यावी.

**काय म्हणाले संजय गायकवाड?**

प्रसारमाध्यमांशी बोलताना संजय गायकवाड यांनी सांगितले की, रात्री दहा वाजता माझी जेवणाची वेळ असते. त्यामुळे काल रात्री मी नऊ-साडेनऊ वाजता वरण भात आणि पोळी याची ऑर्डर दिली होती. त्यात भातासोबत वरण मिक्स करुन मी पहिला घास घेताच मला खराब वाटला. मला वाटले वरणामध्ये चिंच असेल, म्हणून मी पोळी सोबत दुसरा घास घेतला असता मला वोमिटिंग झाली. त्यामुळे मी वरण चेक केले असता ते पूर्णपणे सडलेले होते.

पुढे बोलताना संजय गायकवाड म्हणाले, आमदारांच्या जिवाशी खेळू नका. कॅन्टिन मालकाकडून अनेकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.

तिथे मिळणाऱ्या निकृष्ट जेवणासंबंधी मी यापूर्वीही तक्रार केली होती. दिवसभरात १० हजार जण या कॅन्टिनमध्ये जेवतात. रात्री समितीच्या चेअरमनलाही हे सांगितले होते. मी जे केले ते मला मान्य आहे. मला त्याचा कोणताही पश्चाताप नाही, असेही गायकवाड म्हणाले.





शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीन कर्मचाऱ्याला जबर मारहाण केली. विधान परिषदेत याचे पडसाद उमटले. हा मुद्दा सभापतींच्या अख्यारित येत असल्याने कारवाई करावी, अशी शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभापती राम शिंदे यांच्याकडे केली.

शिवसेना (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी परिषदेत मुद्दा उपस्थित केला. सरकारमधील माजलेला आमदार बनियान टॉवेलवर येऊन एका गरिब कर्मचाऱ्यांना मारहाण करतो. आमदारांनी कसे राहावे याचे काही संकेत आहेत की नाही. हे गल्लीतील लोक आहेत का? सरकारच्या प्रतिमेला यामुळे बट्टा लागतो आहे. त्यांचा बंदोबस्त करा, अशी मागणी परब यांनी केली. अशा लोकांचा तुम्ही पाठींबा घेणार का? अशा लोकांच्या पाठिंब्यावर सरकार चालवणार का? अशा प्रश्नांची सरबत्ती केली.

आमदार निवास विधिमंडळाच्या कार्यकक्षेत येते. विधिमंडळात मी कुणाला मारहाण केली तर तुम्ही निलंबित कराल, त्यामुळे या आमदाराचे निलंबन करून असे प्रकार खपवून घेणार नाही, असे संदेश जनतेला द्या अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे केली.

निकृष्ट दर्जाचे जेवण मिळाले तर तक्रार करता येते. परंतु, अशी मारहाण योग्य नाही. सभापती व विधानसभा अध्यक्षांनी याची दखल घेऊन योग्य कारवाई करावी, अशी शिफारस मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभापती शिंदे यांच्याकडे केली.

# धारावीची जागा अदानीच्या घशात

### उद्धव ठाकरे यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९:**

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलन देखील गिरणी कामगारांनी आपले रक्त सांडले होते. त्याची आठवण करून देत उद्धव ठाकरे यांनी गिरणी कामगारांच्या आझाद मैदानातील आंदोलनाला पाठिंबा दिला.

त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांना देखील गुडघ्यावर आणण्याचे काम गिरणी कामगारांनी केले होते. आता दिल्लीतील दोघांसाठी मुंबई सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. आता तीच कोंबडी कापायला ते निघाले असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

गिरणी कामगारांच्या विविध मागण्या आणि हक्कांच्या घरासाठी गिरणी कामगारांच्या कुटुंबियांनी आझाद मैदानावर आज आंदोलन केले. या आंदोलनात विरोधी पक्षातील सर्वच नेते सहभागी झाले होते.

मुंबईतील धारावीची जागा अदानीच्या घशात घातली जात आहे. मुंबईतील इतर जागा देखील अदानीला दिल्या जात असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. ज्यांनी मुंबई उभे केली, त्यांना तुम्ही मुंबईच्या बाहेर जागा देणार आहात का? असा प्रश्न ठाकरे यांनी उपस्थित केला. सर्व गिरणी कामगारांना धारावी मध्ये जागा देण्याची मागणी देखील उद्धव ठाकरे यांनी केली.

धारावीमध्ये गिरणी कामगार, पोलिस कर्मचारी, सफाई मजूर या सर्वांना मुंबईमध्येच हक्काची जागा देण्याची मागणी देखील त्यांनी उद्धव ठाकरे यांनी केली. दुर्दैवाने आपले सरकार आले नाही. मात्र आपले सरकार आले असते तर धारावीमध्ये हक्काची जागा तुम्हाला मिळालीच असती, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

**तर घरात गप्प बसणार नाही...**

महाराष्ट्रासाठी मी आणि राज ठाकरे देखील एकत्र आलो आहोत. आम्ही एकत्र कशासाठी आलो? आम्ही देखील आमची राजकीय पोळी भाजत बसलो असतो. मात्र प्रबोधनकारांचे नातू आणि शिवसेनेचा प्रमुखांचे मुले महाराष्ट्रासाठी एकत्र आले आहेत. माझे आजोबा आणि वडील संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये होते. आमच्या डोळ्यासमोर संयुक्त महाराष्ट्र तोडला जात असेल तर आम्ही घरात गप्प बसणार नाही. आम्ही या विरोधात उभे राहणार. जो कोणी मराठी माणसाच्या विरोधात जाईल, त्याच्या विरोधात आम्ही उभे राहणार असल्याचा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

शिक्षक एकत्र उभे राहिले तर आम्ही सर्व मिळून शिक्षकांचा हक्क त्यांना मिळून देवू. शिवसेना पूर्ण ताकतीने तुमच्या सोबत राहील, असे आश्वासन देखील उद्धव ठाकरे यांनी आंदोलनकर्त्या शिक्षकांना दिले.

## लहान मुले, महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ

### मुख्यमंत्र्यांची विधानसभेत कबुली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:**

राज्यात गेल्या काही वर्षात बालके आणि महिलांवरील अत्याचारात वाढ झाली असून गेल्या पाच महिन्यांत लहान मुलांवरील अत्याचाराच्या १० हजारांपेक्षा जास्त घटनांची नोंद झाली तर मार्चपर्यंत तीन महिन्यात महिला अत्याचाराचे ११७९ गुन्हे नोंदले गेले आहेत.

विधानसभा सदस्य काशिनाथ दाते, रोहित पवार, भास्कर जाधव, अमिन पटेल आदींनी विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून राज्यातील वाढती गुन्हेगारी तसेच अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार रोखण्याबाबत शासनाने केलेल्या उपाय योजनांबाबत माहिती विचारली होती. पुणे, खेड, बुलढाणा, अहिल्यानगर आदी ठिकाणी घडलेल्या घटनांचे दाखले देत राज्यात महिला व बाल अत्याचारांचे गुन्हे वाढले असल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत विचारणा या केली होती.

या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रश्नाला उत्तर देताना खालील आकडेवारी सादर केली. तसेच हे गुन्हे रोखण्यासाठी महिला सहाय्य कक्ष, दामिनी व निर्भया पथकांची स्थापना, पोलिसांची गस्त वाढवणे, पोलीस काका व दीदींमार्फत जनजागृती, पोक्सो व जलदगती न्यायालयांची स्थापना, ११२ हेल्पलाईन अशा उपाययोजना केल्या गेल्याचीही माहिती त्यांनी दिली.

पुणे जिल्ह्यात झालेल्या महिलांच्या अत्याचाराबाबत विचारलेल्या प्रशाला उत्तर देताना पुणे ग्रामीण पोलीस हद्दीतील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असून त्याद्वारे गर्दीच्या ठिकाणी पेट्रोलिंग करणे, शाळा / महाविद्यालयांना भेटी देण्यात येतात. तसेच अवैध धंद्यांना प्रतिबंध करण्याकरिता पेट्रोलिंग, कॉम्बींग, नाकाबंदी करण्यात येते तसेच धाडी टाकण्यात येतात, अशी माहिती देण्यात अली आहे.

त्याचबरोबर, महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्हयांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

बलात्काराच्या गुन्ह्यांचे ६० दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरिता क्ळररड पोर्टलद्वारे देखरेख करण्यात येते. पीडित महिलांच्या सहाय्यासाठी राज्यात १२४ महिला समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत. राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आलेले आहेत. डायल ११२ च्या माध्यमातून महिलांना मदत देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## अनधिकृत चर्च हटविण्यात येणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:**

आदिवासी मंत्री उईके यांच्या अध्यक्षतेखाली सर्व आदिवासी आमदाराची एक समिती तयार करून धर्मांतरांसंदर्भातील माहिती व उपाययोजना करण्यात येणार असल्याचे मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले.

राज्यात आदिवासींचे सर्वाधिक धर्मांतरण सुरू असल्याचा मुद्दा विधानसभेत आमदार अनुप अग्रवाल यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडला होता.

राज्यातील अनधिकृत बेकायदा आणि अतिक्रमण केलेल्या चर्च येत्या सहा महिन्यात हटवण्यात येतील, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी विधानसभेत केली. चर्चच्या माध्यमातून धर्मांतरण सुरू असल्याचा गृह विभागाकडे रिपोर्ट असून, सदरचा अहवाल तपासून अशांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याच्या अनेक भागात आदिवासींना विविध प्रलोभन देवून त्यांचे धर्मांतरण केले जात असल्याचा आरोप यापूर्वी अनेकदा करण्यात आला. यावेळी पावसाळी अधिवेशनात आमदार अनुप अग्रवाल आणि भाजपाच्या काही आमदारांनी या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले.

## विकसित महाराष्ट्र @२०४७ 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:**

राज्य शासनानं १०० दिवसांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबवण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र @२०४७ करिता 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार सभागृहात म्हणाले.

'विकसित महाराष्ट्र २०४७ चं 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टे - महाराष्ट्र @ २०४७, मध्यमकालीन उद्दिष्टे महाराष्ट्र @ ७५ व अल्पकालीन उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत.

विकसित महाराष्ट्र -२०४७ च्या 'व्हिजन डॉक्युमेंट' चा मसुदा तयार करण्यासाठी क्षेत्रनिहाय १६ गट स्थापन करण्यात आले आहेत. राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन असे चार प्रमुख आधारस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत.



विकसित महाराष्ट्र- २०४७ च्या व्हिजनमध्ये नागरिकांचं मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीनं राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण हे १८ जून, २०२५ ते १७ जुलै २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे. विधानसभेतील सर्व सदस्यांनी आपल्या समाजमाध्यमांद्वारे, मेळावे, बैठकांमध्ये विकसित महाराष्ट्र - २०४७ च्या नागरिक सर्वेक्षणात सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन करावं. तसंच सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य आस्थापनांच्या माध्यमातून नागरिकांना सर्वेक्षणात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे अजित पवार यांनी सांगितले.

## स्पा सेंटरच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय

### १८ मुलींची केली सुटका

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९:**

पुण्यातील विमानतळ आणि बाणेर या ठिकाणी सुरू असलेल्या दोन स्पा सेंटरवर पोलिसांनी छापेमारी करून तब्बल १८ मुलींची सुटका केली आहे.

यामध्ये विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या स्पा सेंटर मधून १६ मुली तर बाणेर पोलीस ठाण्याच्या आधी सुरू असलेल्या स्पा सेंटर मधून दोन अशा एकूण १८ मुलींची सुटका करण्यात आली. स्पा चालक आणि मॅनेजर आणि अजून त्यांचे काही साथीदार यांच्यावर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलीस उपयुक्त सोमय मुंडे यांनी दिली आहे.

पुण्याच्या अनेक भागात स्पा सेंटरच्या नावाखाली देहविक्री सुरू असल्याचे समोर आले आहे.

## राज्यस्तरीय एसआयटी हीच योग्य दिशा

### शालार्थ घोटाळा

महाराष्ट्र सरकारने शालार्थ शिक्षक भरती प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या राज्यस्तरीय विशेष तपास पथकाने (एसआयटी) एक निर्णायक वळणबिंदू गाठला आहे.

नागपूरमधील स्थानिक एसआयटीच्या कार्यवाहीने सुरुवातीला काही गती दाखवली खरी, परंतु प्रक्रियात्मक गोंधळ व चुकीच्या निर्णयांमुळे तिच्यावर टिकाही झाली.

राज्य पातळीवरील एसआयटी तपाससत्र अधिक शिस्तबद्ध, कायदेशीरदृष्ट्या सुसंगत आणि मानवतावादी पद्धतीने पार पाडत असल्याचा अनुभव आधीच्या प्रकरणांवरून दिसून येतो. शालार्थ प्रकरणाचा व्याप अनेक जिल्ह्यांत पसरल्यामुळे हा तपास केवळ पोलिस चौकशीपुरता मर्यादित न राहता, सखोल आणि संस्थात्मक पातळीवर व्हायला हवा.

**राज्यस्तरीय एसआयटी : का अधिक योग्य?**

राज्यस्तरीय तपासपथक प्रत्येक प्रकरणाचे विश्लेषण करून त्याचे तंतोतंत वर्गीकरण करते, जसे की प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, प्रक्रियात्मक चूक किंवा जाणूनबुजून केलेली फसवणूक. यामुळे अनेक प्रामाणिक शिक्षक, मुख्याध्यापक वा संस्था चालकांवर अन्यायकारक गुन्हेगारी कारवाई टाळता येते.

स्थानिक एसआयटीने काही प्रकरणांत आरोपींची नावे व चेहरे प्रसारमाध्यमांत लीक केल्यामुळे त्यांच्या प्रतिमेला आणि कुटुंबीयांना सामाजिक लज्जास्पद परिस्थितीचा सामना करावा लागला. राज्यस्तरीय एसआयटी मात्र संयमी भूमिका घेत, आरोपपत्र दाखल होईपर्यंत तपशील गोपनीय ठेवते, जी गोष्ट तपासाच्या निष्पक्षतेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

**तपासाचा योग्य फोकस काय असावा?**

हा घोटाळा फक्त शिक्षक वा शाळांपुरता मर्यादित नाही. अनेक संकेत शालार्थ प्रणालीतील अंतर्गत प्रवेश व आर्थिक नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे निर्देश करतात. त्यामुळे तपासाचे लक्ष पुढील बाबींवर असले पाहिजेः

शासकीय लॉगिन ॲक्सेस असलेले अधिकारी

बनावट आयडी तयार करणारे डेटा एंट्री/बॅकएंड ऑपरेटर

लेखा व वितरक यंत्रणा, जिच्यामार्फत बनावट पगार दिला गेला

राज्यस्तरीय एसआयटीकडे डिजिटल पुरावे गोळा करण्याचे साधन व कौशल्य अधिक असल्यामुळे अशा सुस्पष्ट दोषांचे उघडकरण शक्य होते.

प्राथमिक आणि तातडीने सिद्ध होणाऱ्या बाबी

सखोल तपास आवश्यक असला तरी काही गोष्टी तातडीने स्पष्ट करता येऊ शकतातः

१. बनावट शालार्थ आयडीद्वारे पगार घेणे

२. एकाच शिक्षकाने दोन शाळांमधून एकाच वेळी पगार मिळवणे

२. अर्हता नसताना बनावट कागदांवर नेमणूक

३. शाळेत प्रत्यक्ष उपस्थित न राहता, इतर व्यवसाय करताना पगार घेणे

या बाबींवर तात्काळ कार्यवाही केल्यास आर्थिक नुकसान थांबवणे शक्य आहे.

**भरती स्थगनाबाबतची वस्तुस्थिती**

२०१२ नंतर शिक्षक भरती थांबली हे अपूर्ण सत्य आहे. त्यानंतरही ४ सप्टेंबर २०१३ रोजीचा SSN-2013/(17/13)(अ)/Mah-2 शासन निर्णय आला, जो गणित, विज्ञान, इंग्रजी आणि मागासवगार्सांठी भरतीला परवानगी देतो. त्यामुळे अशा भरतींना सरसकट अवैध ठरविणे, किंवा त्यावर संशय घेणे, हे चुकीचे आहे. तपासाच्या आधी निष्कर्ष काढणे अन्यायकारक ठरते.

**जबाबदार पत्रकारितेची गरज**

माध्यमांनी शिक्षकांवरील गुन्हेगारी आरोप आणि प्रशासनातील प्रणालीगत चुका यात स्पष्ट फरक केला पाहिजे. शंका घेणे ही पत्रकारितेची जबाबदारी असली तरी ती पडताळणीसहितच हवी. अन्यथा, ग्रामीण भागातील प्रामाणिक शिक्षकांचा आत्मविश्वास उध्वस्त होतो.

**निष्कर्ष**

शालार्थ घोटाळा गंभीर आहे, पण न्यायाची प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि संवेदनशील असली पाहिजे. निदोषांना वाचवणे आणि दोषींना शिक्षा देणे यामध्ये समतोल राखणे, हाच खरा न्याय आहे.

आता राज्यस्तरीय एसआयटीकडे आशेने पाहिले जात आहे, आणि न्याय मिळविण्याची दिशा अधिक स्पष्ट होत आहे.

■ ■ ■



**अरूण सोपानराव कराळे**
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
एम.ए. (मराठी ), एम.ए. (समाजशास्त्र ), डी.एड. बी.एड., डी.एस.एम
**दत्तवाडी, नागपूर.**
**९०९६३२६२७२**

# पुरवण्या मागण्यांमुळे ढासळली राज्याची आर्थिक स्थिती

## अंबादास दानवेंचा सभागृहात आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:**

राज्यावर ९ लाख ३२ हजार कोटींचे कर्ज झाले असून वाढीव पुरवणी मागण्यांमुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळ्ली आहे, असा आरोप विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत केला.

तसेच राज्याची महसूल तूट ९८ हजार कोटी रुपयांनी वाढली असून यंदा दोन लाखाची तूट राज्याच्या डोक्यावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या पुढारलेल्या राज्याला लाख कोटीची महसूल तूट भूषणावह नाही, असे सांगत सरकारने सादर केलेल्या पुरवण्या मागण्यांचे वाभाडे काढले.

पावसाळी अधिवेशनात ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सरकारने सादर केल्या. दानवे यांनी त्याविरोधात परिषदेत विरोधकांची भूमिका मांडली. दरम्यान, भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी माणूस आणि महाराष्ट्राबाबत केलेल्या वक्तव्याचा समाचार घेतला.



महाराष्ट्र देशाच्या उत्पन्नात वस्तू व सेवा कराच्या माध्यमातून सर्वात जास्त वाटा उचलतो. मात्र केंद्र सरकार राज्याला परतावा देण्याचे प्रमाण खूप कमी आहे. आता कृषी खात्याला पुरवणी मागण्यात फक्त २२९ कोटी रुपये मिळाले आहेत.

संपूर्ण अर्थसंकल्पाचा विचार केला तर कृषी खात्याला ९ हजार कोटीची तरतूद केली आहे. यातील ५ हजार कोटी रुपये फक्त नमो योजनेला आहेत. कृषी विभाग मोठ्या प्रमाणावर महत्वाचा असताना कृषी मंत्री यांनी पाहिजे तेवढ्या निधीची मागणी केली नाही की, मुख्यमंत्र्यांनी दिला नाही, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

केंद्राच्यावतीने राज्याला निधी मिळत नाही. केंद्र सरकार राज्यावर अन्याय करत असल्याने राज्याची आर्थिक स्थिती बिघडली आहे. त्यामुळे आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी सरकार सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाचा निधी वेगळ्या खात्याकडे वळवत आहे. आदिवासी बांधवांवर हा अन्याय आहे, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी सरकारवर ताशेरे ओढले.

निधी नसतानाही कंत्राटे काढून कोट्यवधी रुपयांची अफरातफ? केली जात असल्याचा आरोप दानवे यांनी केला. लाकडी बहिण योजना, बाळासाहेबांच्या संकल्पनेवर पैठण येथे विद्यापीठ, एसटी कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी, अभय योजनांचा गैरवापर आदी मुद्द्यांवरून टीकेची झोड उठवली.

## धान खरेदीसाठी २० जुलै पर्यंत मुदतवाढ

**चंद्रपूर, दि. ०९ जुलै :** रब्बी पणन हंगाम २०२४-२५ अंतर्गत शेतकऱ्यांकडून धान्य व भरडधान्य खरेदी प्रक्रियेसाठी शासनाने दिलेली अंतिम मुदत आता २० जुलै २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अनेक शेतकऱ्यांची खरेदी पोर्टलवरील तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित राहिल्याने शासनाने धान खरेदीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपली धान्य विक्रीची नोंद पूर्ण करावी, तसेच जिल्ह्यातील सहकारी संस्था, खरेदी केंद्रे आणि संबंधित यंत्रणांनीही या मुदतीचा लाभ घेऊन खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तत्काळ करावी.

## कान्हाळगाव ते मांडवा रस्त्यावर खड्डे

**कोरपना, दि. ९ जुलै :** तालुक्यातील कान्हाळगाव ते मांडवा या मार्गाची दुरवस्था झाली आहे सततच्या वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्याने पाणी आणि मोठे खड्या खड्या त्यामुळे रस्त्या रस्त्याला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी या मार्गावरील ये -जा करणाऱ्या वाहनधारकांना आणि नागरिकांना ना त्रास सहन करावा लागत आहे याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी होत आहे या ठिकाणी कायमस्वरूपी पाणी वाहत असल्याने माती साचून रस्ता परिवर्तन झाला आहे. रस्त्यावर खोल खड्डे तयार झाल्याने वाहनाचे नियंत्रण सुटून अपघात होण्याची होण्याचा धोका आहे.

# ब्रम्हपुरी तालुक्यातील शाळा, महाविद्यालयाला १० जुलैला सुट्टी

### जिल्हाधिकारी यांचा सुरक्षीततेसाठी निर्णय

भारतीय हवामान खात्याने ७ जुलै २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला असून पुढील काही दिवस अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच, गोसीखुर्द प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून प्राप्त सतर्कतेनुसार, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे वैनगंगा नदीपात्रामध्ये पूरनियंत्रणासाठी १६,५०० ते १८,००० क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. दरम्यान, मागील दोन दिवसांपासून ब्रह्मपुरी तालुक्यातही मुसळधार पाऊस सुरु आहे. परिणामी, नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी व संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून, ब्रहमपुरी तालुक्यातील सर्व अंगणवाड्या, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये तसेच खाजगी कोचिंग क्लासेस यांना दिनांक १० जुलै २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विनय गौडा जी सी यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३० (२)(५) व (१८) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करत हा निर्णय घेतला आहे.



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ०९ जुलै :** ब्रम्हपुरी तालुक्यात सलग दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. सोमवार, दिनांक ०७ जुलै २०२५ रोजी १०८ मिमी तर ०८ जुलै रोजी १६२ मिमी पावसाची नोंद झालेली आहे. त्यामुळे तालुक्यातील काही मुख्य रस्ते व महामार्ग पाण्याखाली गेले आहेत.

पुरामुळे ब्रम्हपुरी – वडसा महामार्ग, आवळगाव – गांगलवाडी, कन्हाळगाव – ब्रम्हपुरी, ब्रम्हपुरी – चांदगाव, दुधवाही – ब्रम्हपुरी व पारडगाव – ब्रम्हपुरी रस्ते बाधीत झाले आहे. गोसीखुर्द धरणातील विसर्ग: धरणातून सध्या १३,००० क्युसेक मीटर विसर्ग सुरू असून पुढील मुसळधार पावसामुळे विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन पथक तैनात, पूरप्रभावित गावातील नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची तयारी आहे.

# वैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत

### पावसामुळे घर पडली, हजारो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ९ जुलै :** तालुक्यात झालेल्या सततच्या पावसामुळे व गोसेखुर्द प्रकल्पाच्या पाण्याच्या विसर्गामुळे ब्रम्हपुरी तालुक्यात नदी नाल्यांना पूर येऊन शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर शेत जमीन पाण्याखाली आली आहे. सततच्या पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली आहे. नदी नाल्यांना पूर येऊन अनेक मार्ग बंद झाले आहेत. काही गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.



सततच्या पावसामुळे व गोसेखुर्द प्रकल्पाच्या पाण्याच्या विसर्गामुळे वैनगंगा नदी पात्रात पाण्याची वाढ होऊन नदीपात्र दुधडी भरून वाहत आहे. तालुक्यातील नदी काठावरील गावांमध्ये नदीच्या पुराचे पाणी शिरल्याने अनेक गावे पुराने प्रभावित झाली आहेत . पिंपळगावात पुराचे पाणी शिरले आहे. लाडज गावाला बेटाचे स्वरूप आले आहे. गांगलवाडी आरमोरी मार्ग बंद झाल्याने पुराच्या पाण्यातून मार्ग काढताना पुरामध्ये ट्रक फसला आहे. हजारो हेक्टर शेत जमीन पाण्याखाली आली आहे. पावसामुळे व पुरामुळे धान पीक व भाजीपाला पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने शेतकरी चिंतेत आहे.

### ब्रम्हपुरीतील ही मार्ग पडली बंद

वैनगंगा नदीला पूर आल्याने ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक मार्ग बंद झाली असून यामध्ये ब्रम्हपुरी - वडसा , ब्रम्हपुरी ते आरमोरी, मेंडकी - नवेगाव खुर्द , ब्रम्हपुरी ते चांदगाव, ब्रम्हपुरी -बोरगाव, रानबोथली ते ब्रम्हपुरी, खंडाळा ते कन्हाळगावं, पारडगाव ते बेटाळा, कालेता ते नानोरी, निलज-बेलपातळी -मुई- मांगली, उचली ते मौशी , कुर्झा ते अर्हेर नवरगाव , गांगलवाडी ते आरमोरी, पारडगाव ते ब्रम्हपुरी , खरकाडा (पिंपळगाव) ते नीलज, आवळगाव ते गांगलवाडी, कुडेसावली-मुडझा, खरकाडा ते रणमोचण ही मार्ग बंद झाली असून गांगलवाडी ते मुडझा व वांद्रा ते एकारा मार्ग बंद होण्याच्या मार्गावर आहे. बेटाळा येथे जाणारे दोन्ही मार्ग बंद झाले आहेत.



सापडलेला

सतत धार पावसाने तालुक्यात काही ठिकाणी घरे पडली आहेत. नदी काठावरील गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील जवळपास १८ गावांचा तालुक्याची संपर्क तुटल्याने प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकानी केली आहे. नुकसान ग्रस्त भागाची पाहणी करून तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# अतिवृष्टीने प्रकाश देवढगले यांची शेतातील विहिर खचली

### लाखोचे नुकसान, तीन घरांच्या भिंती कोसळल्या



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रह्मपुरी, दि. ९ जुलै :** गेल्या दोन दिवसापासून चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजविल्यामुळे ब्रह्मपुरी तालुक्यातील अ-हेरनवरगांव येथील शेतकरी प्रकाश दादाजी देवढगले यांच्या शेतातील अंदाजे २२ वर्ष जुनी दगडाने बांधलेली विहीर खचली.

विहीर खचल्यामुळे विहिरीवर असलेला मोटार पंप दगड, मातीच्या ढिगाऱ्याखाली दबल्यामुळे आणि नुकतेच वैनगंगा नदीच्या पुराचे पाणी शेतात घुसल्यामुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे त्यामुळे त्यांचे अंदाजे लाखोचे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसाची संततधार सुरू असल्यामुळे गावातील पंढरी उरकुडे ,नंदलाल ठेंगरे, लालाजी कराणकर यांच्या घराच्या भिंती कोसळल्यामुळे घराचे फार मोठे नुकसान झाले आहे. अ-हेरनवरगांव येथील तलाठी संजय मटाले यांनी भर पावसात पडलेल्या घरांची मोका पाहणी केली व शासनाकडून आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे घर मालकांना सुतोवाच केले. तसेच गावातील हजारो एकर शेती पाण्याखाली असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे त्यामुळे त्यांची या पावसाने कंबरच मोडली आहे. शासन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देते का याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागलेले आहे.

# भर पावसात ब्रम्हपुरी नगर परिषदेत भाजपाने फेकले चिखल

### भूमिगत गटार योजनेतील अनियमितता व चिखलयुक्त परिस्थितीवरील भोंगळ कारभारा विरोधात आंदोलन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रह्मपुरी, दि. ९ जुलै :** ब्रहमपुरी नगर परिषद क्षेत्रात भूमिगत गटार योजनेचे काम सुरू आहे. केंद्र व राज्य सरकारने या प्रकल्पासाठी मोठा निधी ब्रहमपुरी नगर परिषदेला दिला परंतु या कामामध्ये मोठी अनियमितता असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत शहरातील विविध भागात चिखलयुक्त परिस्थिती निर्माण झाली असून रोज नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. २६ जून रोजी भाजपा शिष्टमंडळाने नगर परिषद कार्यालयात निवेदन देत पुढील सात दिवसांत समस्या न सोडविल्यास चिखलफेक आंदोलन करण्याचा इशारा शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी दिला होता.



सात दिवस उलटून ही नगर प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न झाल्याने भाजपा नेते, माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ८ जुलै रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने भर पावसात आंदोलन करण्यात आले. भर पावसात ही मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते. चिखल नगर परिषदेत फेकण्यात आले. यावेळी नगर परिषद प्रशासकांकडून पुढील चार ते पाच दिवसांत युद्ध पातळीवर काम करण्याचे आश्वासन देण्यात आले. आश्वासनाची पूर्तता न झाल्यास अजून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपा शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी दिला. भाजपा कार्यालय पासून या मोर्चाला सुरवात झाली. या प्रसंगी शहर अध्यक्ष सुयोग बाळबुधे, माजी अध्यक्ष अरविंद नंदूरकर, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रकाश बगमारे, जिल्हा सचिव साकेत भानारकर,माजी नगरसेवक मनोज वठे, माजी नगरसेवक मनोज भूपाल,विलास विखार युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस ,तनय देशकर, स्वप्नील अलगदेवे, दत्ता येरावार,अमित रोकडे,पवन जयस्वाल,अशोक सालोटकर,प्रा.संजय लांबे, राजू भागवत,जुंबडे सर,नितीन आंबोरकर,बंटी येरावार,दिलीप पंडित,डॉ. सुमित जयस्वाल, नागरीक उपस्थित होते.

# आंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी तहसील कार्यालयावर भर पावसात धडकला मोर्चा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ जुलै :** चिमूर येथे आंगणवाडी कर्मचारी सभेचे जिल्हा अध्यक्ष इम्रान कुरेशी यांच्या नेतृत्वात विविध मागण्यांसाठी भर पावसात तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला कायमस्वरूपी कामातील कंत्राटी करणाला मज्जाव, खाजगीकरणाला विरोध, बेकारी हटवा, सार्वजनिक उद्योग विकु नका, रेशन व्यवस्था बळकट करा, समान कामाला समान दाम, शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोगाची शिफारस लागु करा आदी मागण्यांसाठी देशभरातील संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगार बुधवारला एक दिवशीय सार्वत्रिक संप केलेला आहे. त्या संपात महाराष्ट्रातील सर्व आंगणवाडी कर्मचारी सहभागी झाल्या आहेत



आंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, एफ. आर. एस. ची सक्ती करण्यात येवु नये, अर्हताप्राप्त सेविकेचे ५५ वर्ष वयोमर्यादा करुन पर्यवेक्षिकेच्या जागा तातडीने भरण्यात याव्यात, चालकाच्या आहाराचा दर ८ रुपये वरून १६ रुपये करावा व स्तनदा गरोदर माता अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा आहाराचा दर दुप्पट करण्यात यावे. समृध्दी आहाराचा दर ६५ पैस्यावरून २ रुपये करण्यात यावा, मानधनाची निम्मी रक्कम पेन्शन म्हणुन देण्यात यावी,आंगणवाडयांना नव्या दराने घरभाडे देण्याचे ठरविले असुन त्याच्या जाचक अटी रद्द करून घरभाडे देण्यात यावे, मदतनीसला थेट नियुक्तीसाठी असलेली २ वर्षाची अट रद्द करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश होता

महाराष्ट्र राज्य आंगणवाडी कर्मचारी कृती समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करून व त्यांचे प्रश्न सोडवुन राज्यातील आंगणवाडी कर्मचाऱ्यांना न्याय देण्यात यावे, अशी आंगणवाडी कर्मचाऱ्यांची मागणी असल्याचे अंगणवाडी कर्मचारी सभेचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष इम्रान कुरेशी यांनी सांगितले

चिमूर येथील किल्ला मैदान येथून मोर्चाची सुरुवात करण्यात आली होती नंतर पंचायत समिती चिमूर येथे एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी पूनम गेडाम यांनी विविध मागण्यांचे निवेदन स्वीकारले नंतर मोर्चा तहसील कार्यालयाकडे वळला तिथे सुद्धा अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले तिथुन मोर्चा बाल विकास प्रकल्प कार्यालय नागरी प्रकल्प येथे गेला तिथे प्रकल्प अधिकारी प्रकाश भांदककर यांना निवेदन देऊन मोर्चाचा समारोप करण्यात आला या मोर्चात पोलीस विभागाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# चंद्रपूर जिल्ह्यातील कार्पेट प्रकल्पासाठी जिल्हाधिकारी सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** खनिज मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील जिल्हा खनिज प्रातिष्ठान (DMF) कार्यशाळेचे आयोजन नवी दिल्ली येथे करण्यात आले. चंद्रपूर जिल्ह्यातील कार्पेट प्रकल्पासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा सदर कार्यशाळेत सत्कार करण्यात आला.

या एकदिवसीय कार्यशाळेचा मुख्य उद्देश जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत विविध



राज्यांमध्ये सुरू असलेल्या उपक्रमांचा परस्पर अभ्यास, अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे आणि प्रधानमंत्री खानिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) च्या प्रभावी अंमलबजावणीस गती देणे हा होता.

कार्यशाळेदरम्यान 'पारदर्शकता व अनुपालन' या विषयावर सखोल चर्चा झाली. यात मुख्यतः DMF योजनांच्या अंमलबजावणीत आढळणाऱ्या त्रुटी, संभाव्य धोके तसेच या योजनांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक असलेल्या अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची सविस्तर मांडणी करण्यात आली. चर्चेमधून मिळालेल्या महत्त्वपूर्ण शिफारशींमुळे भविष्यातील धोरणनिर्मितीस दिशा मिळणार असून DMF योजना अधिक प्रभावी, पारदर्शक व लोकाभिमुख करण्यासाठी मार्गदर्शन झाले आहे. या कार्यशाळेत सहभागी अधिकाऱ्यांना विविध राज्यातील यशस्वी उपक्रमांची माहिती घेण्याची संधी मिळाली.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी केले दोन तास धरने आंदोलन

### राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र जिल्हा शाखा चंद्रपूरचे नेतृत्व

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** केंद्र, राज्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे सांप्रत शासनाचा लक्षवेध करुन घेण्यासाठी दि. ९ जुलै २०२५ रोजी देशस्तरावरील कामगार-कर्मचारी संघटनांनी देशव्यापी संपाची हाक दिल्याच्या अनुषंगाने महाराष्ट्रात या संप आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी तसेच राज्यस्तरावरील प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय कामगार-कर्मचारी संघटनेच्या आवाहनानुसार राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, चंद्रपूर च्या वतीने २१ मागण्यांकडे शासनाचा लक्षवेध करुन घेण्यासाठी बुधवार,



दिनांक ९ जुलै २०२५ ला चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत निदर्शने देत दोन तास धरणे आंदोलन करण्यात आले.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, चंद्रपूर जिल्ह्यातील ९ तालुक्यामध्ये नक्षलग्रस्त व आदीवासी क्षेत्रातील लाभ चालु ठेवण्यात यावा, एकवेळची बाब म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या द्याव्यात, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे दि. १ जानेवारी २०२५ पासून २ टक्के महागाई भत्तावाढ मंजूर करणे आदी प्रलंबित मागण्या तसेच इतर १७ मागण्यांच्या पूर्ततेसाठी दोन तास 'वॉक आऊट' आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष दिपक जेऊरकर, राजु धांडे, अजय टेप्पलवार, प्रकाश सुरमवार यांनी प्रलंबित मागण्यांसंदर्भात उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

या आंदोलनाचे सुत्र संचालन श्रीकांत येवले यांनी केले तसेच आभार प्रदर्शन चंद्रकांत कोतपल्लीवार यांनी केले.

या 'वॉक आऊट' आंदोलनात दिपक जेऊरकर, राजु धांडे, श्रीकांत येवले, सिमा पॉल, चंद्रकांत कोतपल्लीवार, रजनी आनंदे, अजय चहारे, राकेश शेंडे, प्रविण अदेंकीवार, मनोहर धाईत, नम्रता सरोवरे, अमोल शिंदे, किरण वैरागडे, महेश नाडमवार, अनुप भोयर, अतुल किनेकर, प्रकाश राऊत, शैलेश जुमनाके, संदीप ठाकरे, नारायण मोरे, आकाश पेटकुले जिल्हा परीषद महासंघाचे पदाधिकारी शालीकराम माऊलीकर, अजय टेप्पलवार, सेवानिवृत्त संघटनेचे अरुण धानोरकर तसेच जिल्हा परीषद कर्मचारी, महसुल विभाग, बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, कोषागार कार्यालय, वन विभाग, वस्तु व सेवा कर विभाग, भुमि अभिलेख विभाग, कृषी विभाग,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कर्मचारी, भुविज्ञान-खनिकर्म विभाग, आरोग्य विभाग, पोलीस अधिक्षक कार्यालय कर्मचारी आदी विभागाचे कर्मचारी व इतर सर्व शासकीय कार्यालयीन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग दर्शविला होता.

# गटार योजनेमुळे नगर परिषद क्षेत्रात पडले खड्डे

### वाहनासह पायदळ चालणाऱ्यांना नाहक त्रास



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ९ जुलै :** नागभीड नगर परिषद क्षेत्रात पाणी पुरवठा योजना व गटार योजनेचा फज्जा उडाला असून अनेक ठिकाणी गटार योजनेमुळे रस्त्याची वाट लागली असून गटार योजनेच्या माध्यमातून रस्त्याचे दोन भाग होत असून त्या ठिकाणी फक्त गीट्टी टाकून दबाई होत नसल्याने आणि सतत पाऊस पडल्याने अनेक ठिकाणी पाणी साचून खड्डे पडले आहेत यामुळे चारचाकी वाहने दुचाकी वाहने आणि पायदळ चालणाऱ्याना त्रास सहन करावा लागत असून नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष कारणीभूत आहे. गेल्या काही वर्षांत प्रशासक असलेल्या अधिकाऱ्यांनी ही बाब लक्षात न घेतल्याने नगर परिषद क्षेत्रात विकासाची गंगा येण्यापेक्षा गटार गंगा कशी वाढेल यावर भर देण्यात आल्याचे दिसून आल्याने नगर परिषद क्षेत्रात विविध समस्या निर्माण झाल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. नव्याने रुजू झालेल्या मुख्याधिकारी देशमुख कोणती कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

# चांगले मार्गदर्शन, प्रेरणा व संस्कार देणारा
# प्रत्येक व्यक्ती आपला गुरू !

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील पौर्णिमेलासाजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसून येते. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण गुरू शिवाय ज्ञान नाही ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून गुरूचे विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासून आपल्याला चांगल्याप्रकारची चालना, गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम, आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती आपल्याला आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.

------------


आई-वडिल हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत. जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे. आई-वडीलांसमोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे. ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते. आई मायेचे पांघरूण घालून मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो.

त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण आईग म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दुःख कमी होते. त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण बापरे म्हणतो. यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो. अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते.

म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो.

त्याचप्रमाणे आपण नेहमी पाहतो की आई-वडीलांचा अपमान कोणीही सहन करीत नाही आणि करणार नाही. अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात. यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.

म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन. यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या आकार सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील यांचे वटवृक्षाचा पहारेकरी बनून परिवाराचे जतन व संरक्षण करते.



मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दुःखाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासून मिळत असते.

आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो. कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.

त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते. कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते. त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकली जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग, खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद, निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा.

गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो तिच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग, सत्ययुग, कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते. याकरीता गुरूची आवश्यकता असणे गरजेचे असते.

राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते. यातुन राजकीय पुढारी तयार होतात. आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवू शकतो.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही.

कोणतेही क्षेत्र असो अनुभव, ज्ञान, माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते गुरू बिना ज्ञान अधुरा. आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो. कारण आपण केलेल्या कायार्ला यश प्राप्त झाले पाहिजे.

भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत, थोरमहात्मे होवुन गेले. याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. भारताला विश्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते. जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे. आज भारत विश्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.

या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धमार्ची जोपासना यामुळेच भारताला विश्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला, त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.

आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.

शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही, आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही, भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही, बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही, मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.

प्रत्येक परिवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते. त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.

आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रितीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.

ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे. गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !

# शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्तम गुरू...
# बबनराव गुळवे गुरूजी !

**प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर अनेक गुरु भेटतात. सर्वच गुरु आपल्याला प्रामाणिकपणे ज्ञान व संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. त्यांच्याकडून आपल्याला योग्य दिशा व योग्य मार्गदर्शन मिळते. जीवन जगण्याचा मूलमंत्र शिकायला मिळतो. जीवनात लवकर यश संपादन करायचे असेल तर आपल्याला गुरुचा सल्ला घेणे आणि गुरूच्या विचारानुसार चालणे अत्यंत गरजेचे असते. आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी यशाला गवसणी घातली आहे, त्या सर्वांनी गुरुच्या विचारानुसार आणि मार्गदर्शनानुसार वाटचाल करून यशाला काबीज केले आहे. ज्याच्या आयुष्यात गुरु नाही, असा माणूस या पृथ्वीतलावर शोधूनही सापडणार नाही.**

-------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर जि. लातूर**
**7498715661**

-------------

आपल्या आयुष्यातील पहिले गुरु हे आपले आई-वडील असतात. प्रथम प्राधान्य गुरु म्हणून आपल्याला आई-वडिलांना द्यावे लागेल. कारण त्यांनी नकळत आपल्या बालमनावर चांगले संस्कार बिंबवलेले असतात. म्हणून त्यांना विसरणे कदापी शक्य नाही.

घरातील आई-वडील व आजी-आजोबा, शाळेतील शिक्षक आणि गावातील वडीलधारी माणसे यांचा गुरु म्हणून आपल्या जीवनात मोलाचा वाटा असतो. आई-वडिलांच्या नंतर मला शालेय जीवनातील माझे गुरु म्हणून बबनराव गुळवे गुरुजी यांचा उल्लेख करावा वाटतो.

कारण बबनराव गुळवे गुरुजी हे केवळ विद्यार्थ्यांचेच गुरु नाहीत. तर ते शाळेतील सहकारी शिक्षकांचे सुद्धा गुरु आहेत. ते आपल्या चालण्यातून, बोलण्यातून, अध्यापनातून व वर्तनातून नकळत विद्यार्थ्यांवर व सहकारी शिक्षकांवर संस्काराची छाप पाडत असतात.

बबनराव गुळवे गुरुजी हे शिक्षकी पेशातील आदर्श शिक्षक व आदर्श गुरु आहेत. ते माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचे लाडके गुरु आहेत. एका गुरुमध्ये असणारे सर्व गुण बबनराव गुळवे गुरुजींमध्ये आहेत. गुणी, ज्ञानी व सर्वगुणसंपन्न गुरु म्हणून अनेक शिक्षक बबनराव गुळवे गुरुजींकडे आदराने बघतात.

त्यांच्या हाताखालून गेलेला विद्यार्थी भविष्यात कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. गुळवे गुरुजींचे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहेत. गुळवे गुरुजींचे अनेक विद्यार्थी गुरु पौर्णिमेला व शिक्षक दिनी त्यांना प्रत्यक्ष भेटून मनःपूर्वक शुभेच्छा देऊन त्यांचे वंदन करतात.

गुळवे गुरुजी गणित विषयाचे तज्ञ शिक्षक आहेत, आणि साहित्य क्षेत्रातील नामांकित व दर्जेदार लेखक आहेत. त्यांचे दररोज विविध वर्तमानपत्रात लेख छापून येतात. त्यांचे लेख वाचकांसाठी एक अनमोल ठेवा असतो. त्यांनी आतापर्यंत हजारो लेख लिहून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

शिक्षक कसा असावा याचे उत्तम उदाहरण गुळवे गुरुजींकडे बघितल्यावर आपल्याला कळते. अतिशय सुसंस्कारी, प्रचंड ज्ञानी, गुणी, चारित्र्यवान, निष्कलंक व निष्कपट असणारे त्यांचे व्यक्तिमत्व भल्या-भल्या शिक्षकांना थक्क करणारे आहे. म्हणूनच गुळवे गुरुजींना सहकारी शिक्षक सुद्धा गुरुचा दर्जा देऊन त्यांचा सन्मान करतात. त्यांनी विद्यार्थी घडवण्याचे काम तर केलेच आहे, पण शिक्षकांना सुद्धा घडवण्याचे काम गुळवे सर नकळत आपल्या वर्तनातून व अध्यापनातून करत असतात.

मी सुद्धा गुळवे सरांचा विद्यार्थी आहे. गुळवे गुरुजी गणित विषयाचे तज्ञ शिक्षक आहेत. त्यांच्या हाताखाली आत्तापर्यंत हजारो विद्यार्थी घडले आहेत आणि वेगवेगळ्या क्षेत्रात दिमाखाने कार्य करत आहेत. मी गुळवे सरांचा विद्यार्थी दहावीला असताना गणित विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालो होतो.

मी गुळवे सरांकडून दोन गोष्टींचे परिपूर्ण ज्ञान घेतले आहे. एक म्हणजे गणित विषयाचे आणि दुसरे म्हणजे लेख लिहिण्याचे. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. गुळवे सरांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक पुरस्काराने व महात्मा फुले पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांचे लेख वाचून कित्येक विद्यार्थी घडत आहेत.

एकदा गुळवे सरांच्या सावलीत बसलेल्या माणसाला लवकर उठूच वाटत नाही. गुळवे सरांच्या लेखाच्या व अध्यापनाच्या आहारी गेलेला माणूस भविष्यात कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. मी पण गुळवे सरांचे लेख वाचून साहित्य क्षेत्रात चांगल्या प्रकारे लेखन करत आहे. मी गुळवे सरांना गुरुस्थानी मानून त्यांच्या प्रत्येक लेखाचे तंतोतंत पालन करत असतो.



ते आपल्या वर्तनातून आणि आपल्या लेखातून समाज मनावर प्रभाव पाडण्याचे काम करत असतात. त्यांचे लेख हे वैचारिक व प्रबोधनात्मक असतात. कोणालाही समजेल अशा साध्या व सोप्या भाषेत लिहिलेले असतात. असे सुसंस्कारी ज्ञानी, गुणी, चारित्र्यवान व आदर्श शिक्षक सध्या शिक्षण क्षेत्रात दुर्मिळ झाले आहेत. आणि व्यसनी, राजकारणी, कामचुकार व टाईमपास करणारे शिक्षक सध्या शिक्षण क्षेत्रात प्रचंड वाढले आहेत.

अशा शिक्षकांमुळे शिक्षण क्षेत्राला कलंक लागत आहे. हा कलंक पुसून टाकण्याचे प्रामाणिक काम बबनराव गुळवे सरांसारखे आदर्श शिक्षक करत आहेत. म्हणून अशा प्रामाणिक व निष्कलंक शिक्षकांच्या कार्याला मनापासून सलाम करावा वाटतो. मी गुळवे सरांचा विद्यार्थी म्हणून भलेही कोणत्या क्षेत्रात नोकरीला लागलो नाही, पण त्यांचा विद्यार्थी म्हणून एक चांगला लेखक व कवी म्हणून सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम करत आहे. हेच मला खूप मोठे काम वाटत आहे.

आईवडील, आजी-आजोबा व गावातील वडीलधारी माणसे हे तर प्रत्येकाचे जीवनातील चांगले गुरु असतातच. पण मी माज्या जीवनातील माझा खरा गुरु म्हणून आई-वडिलांच्या नंतर बबनराव गुळवे सरांना गुरुस्थानी मानतो. आणि या लेखाचा समारोप करताना मी प्रत्येक शिक्षकाला व विद्यार्थ्याला एवढेच सांगू शकतो की, आपण बाबांनो, आपण गुळवे सरांची प्रेरणा व आदर्श घेऊन शिक्षण क्षेत्रात सर्वोत्तम काम करावे.

गुळवे सरांचे अध्यापन पहावे, त्यांचे लेख वाचावे, त्यांचे वर्तन आचरणात आणावे, आणि शिक्षण क्षेत्राला लागलेले कलंक पुसून टाकावेत. हीच गुरुपौर्णिमेनिमित्त आपल्याला नम्र प्रार्थना आहे..आणि गुळवे सरांना गुरुपौर्णिमेनिमित्त माज्यातील लेखक व कवी जागा केल्याबद्दल त्यांचा शिष्य म्हणून त्यांचे खूप खूप आभार आणि त्यांना कोटी कोटी वंदन...

■ ■ ■

# : शिवथरघळ :
# अध्यात्म ऊर्जा आणि विज्ञानाचा नवा अध्याय

**संदीप यशवंत मोने**
**पेण ,रायगड.**
**8698779546**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात वरंधा घाटाच्या कुशीत वसलेले शिवतरघळ हे ठिकाण आजवर इतिहास आणि अध्यात्म या दृष्टिकोनातूनच अधिक ओळखले जाते. येथे समर्थ रामदास स्वामींनी त्यांचे शिष्य कल्याण स्वामींना दासबोध सांगितला. तेथेच समर्थ रामदास स्वामी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या भेटी झाल्या ही माहिती महाराष्ट्राच्या जनमानसात खोलवर रुजलेली आहे.

पण, आजच्या बदलत्या काळात शिवथरघळ कडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक करण्याची गरज आहे. मनाच्या श्लोकामध्ये समर्थ रामदास स्वामी म्हणतात

*नभी वावरे जो अणूरेणू कांही ।*
*रिता ठाव या राघवेवीण नाही ।*
*तया पाहता पाहता तेचि जाले ।*
*तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले ॥*

या ओवीतूनच समर्थ रामदास स्वामींचा वैज्ञानिक दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो.

शिवथरघळ हे ठिकाण जिओ एनर्जी व्होरटॅक्स म्हणजेच अशी जागा जिथे पृथ्वीतील चुंबकीय प्रवाह, ध्वनि कंपन , उष्णता आणि जैविक ऊर्जा एकत्र होते. अशा ठिकाणी ध्यान केल्यास मन अधिक स्थिर होते, विचार स्पष्ट होतात. ही अनुभूती अनेक साधक, विचारवंत, शिवभक्त आणि स्थानिकांना वेळोवेळी आली आहे.

शिवथरघळीला निसर्गानेही भरभरून दिले आहे. येथील पर्वतरांगा, खडकांची रचना, थंड हवामान, शांतता हे सर्व घटक ध्यान साधना करीता योग्य आहेत. त्यामुळे ही जागा ऊर्जा आधारित ध्यान संशोधन केंद्र म्हणून विकसित होऊ शकते. या जागेचा अधिक अभ्यास करण्यासाठी जिओ एनर्जी मॅपिंग करता येईल. यात विद्युत चुंबकीय, भू चुंबकीय, तापकीय ऊर्जा ,ध्वनी कंपन यांचे मापन करून या जागेचा अचूक वैज्ञानिक नकाशा तयार केला जाऊ शकतो.

ध्यान करताना मेंदूतील विद्युत तरंग म्हणजेच विद्युत मेंदू आलेख मोजले जाऊ शकतात. हृदय स्पंदनातील बदल मापन सुध्दा करता येते. ध्यानामुळे मज्जासंस्थेची प्रक्रिया अधिक संतुलित रहाते.

शिवथरघळीवर आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संशोधन झालेले आढळून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आतापर्यंत हे ठिकाण पूर्णतः धार्मिक आणि पर्यटन केंद्र म्हणूनच प्रकाशात आणले गेले. त्यामुळे शिवथरघळीच्या ऊर्जा क्षेत्रांचा अभ्यास झालाच नाही. भू उर्जा केंद्र, ध्यान, संशोधन, मानसिक आरोग्य विकासा करिता शिवथरघळचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

जागतिक स्तरावर संशोधना साठी शिवथरघळीला शासन स्तरावर प्राधान्य मिळायला हवे. IIT (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, IISER (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँण्ड रिसर्च) उरक्फ (कौन्सिल फॉर सायंटिफिक अँण्ड इंडस्ट्रियल रिसर्च) NIMHANS (मानसिक आरोग्य संस्थान, बेंगळुरू), IGNOU (इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ) या भारतीय संस्थांच्या माध्यमातून पायलट प्रकल्प सुरू करता येतील.

त्यानंतर याचे परिणाम आणि संशोधन पुढे खालील आंतरराष्ट्रीय संस्थांसमोर सादर करता येतील. स्टॅंडर्ड सी केअर, हावर्ड मेडिकल युनिव्हर्सिटी, युनेस्को ग्लोबल जिओ पार्क प्रोग्रॅम, आणि वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन मेंटल हेल्थ डिव्हिजन यांच्यासोबत प्रस्ताव सादर करता येऊ शकतो.

या दृष्टीने भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनासाठी पुढील शिफारसी करता येतील.

१. आयआयटी किंवा आयआयसीईआर यांच्या सहकार्याने शिवथरघळ येथे भूउर्जा मापन प्रकल्प सुरू करावा.

२. हृदय स्पंदनातील बदल मापन संशोधन केंद्र उभारावे.

३. दासबोध ध्यान केंद्र आणि ध्वनी परावर्तन प्रयोगशाळा उभाराव्यात.

४. जैवविविधता आणि औषधी वनस्पती अभ्यासासाठी पर्यावरण केंद्र उभारावे.

५. मानसिक आरोग्यासाठी ध्यानाधारित उपचार केंद्र सुरू करावे.

६. दासबोध, समर्थ विचार आणि ऊर्जा संशोधन विषयक डिजिटल संग्रहालय विकसित करावे.

शिवथरघळ हे केवळ एक ऐतिहासिक ठिकाण नसुन ते आजच्या पिढीसाठी आत्मशोध, मानसिक स्थैर्य आणि ऊर्जा संतुलन यासाठी एक प्रेरणास्थान आहे.अशा बहुआयामी संशोधनाद्वारे शिवथरघळचे जैवविविधतेतील महत्त्व पुराव्या आधारित पद्धतीने जागतिक पातळीवर सिद्ध करता येईल.

■ ■ ■

# गुरूचे महत्व

आषाढ महिन्याची पौर्णिमा ही गुरु पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. या दिवशी आपण आपल्या शैक्षणिक तसेच आध्यात्मिक गुरूंचा आदर सत्कार करुन त्यांच्या प्रति श्रद्धा व कृतज्ञता व्यक्त करतो.



**संत राजिंदर सिहजी महाराज**

सांसारिक जीवनात जेव्हां आपल्याला एखादया विषयाचा अभ्यास करायचा असतो, तेव्हा आपण अशा व्यक्तीकडे जातो, जी त्यात पारंगत आहे आणि तो विषय ती व्यक्ति आपल्याला शिकवू शकते . जर आपला आध्यात्मिक विकास करायचा असेल तर आपल्याला अश्या व्यक्ति कडे जावे लागेल जी अध्यात्मात पारंगत आहे. एक पुर्ण सद्गुरु आध्यात्मात पारंगत असतात.

सुदैवाने प्रत्येक वेळी या पृथ्वीतलावर एक ना एक पुर्ण सदगुरु अस्तित्वात असतात , जे आपल्याला आपल्यातील आत्मिक शक्तीशी जोडण्यासाठी मदत करतात. प्रत्येक युगात असे संत महात्मे पृथ्वी वर येत असतात जे आमच्या आत्म्याला आंतरिक यात्रेवर घेऊन जाण्यात समर्थ असतात.

संत सांगतात की परमेश्वराची सत्ता ही कुठल्या न कुठल्या मानवी देहातून कार्य करत असते. मनुष्य इतर मनुष्यांकडूनच शिकत असतो. संत या जगात येतात आपल्याशी आपल्या स्तरावर येऊन बोलण्या साठी,अंतरिक अनुभव प्राप्त करण्याची पद्धत आपल्या भाषेत स्पष्ट करून सांगण्यासाठी, जेणे करुण ते आम्हालाही आंतरिक अनुभव करुन देऊ शकतील.केवळ बोलून किंवा वाचून अध्यात्म शिकता येत नाही. हे केवळ वैयक्तिक अनुभवातूनच शिकले जाऊ शकते आणि असा अनुभव मात्र आपल्याला संपूर्ण सदगुरूच देऊ शकतात.

नामदानानंतर सदगुरु शिष्याच्या अंतरी वास करतात. तेव्हां पासून ते प्रत्येक क्षणी शिष्याबरोबर राहतात व त्याला सगळ्या प्रकारे सुरक्षित ठेवतात. सदगुरुंचे हे संरक्षण केवळ या जगातच नाही तर त्यापलीकडेही कायम राहते . शिष्याच्या कमार्चा भार सदगुरू आपल्या खांद्यावर घेतात व सदैव त्याच्या अवती भवती राहतात. शिष्याच्या मृत्यु वेळी ते त्याच्या सोबतच असतात व त्याच्या पुढील प्रवासात त्याचे मार्गदर्शक बनतात. अश्या वेळी सद्गुरु आपल्या अंतरि प्रकट होतात व सदगुरू आम्हाला प्रेमाने हृदयी लावतात,ते आम्हाला दिव्य प्रकाश्याच्या मध्यभागी घेऊन जातात.

करुणा व ममतेने ओतप्रोत सद्गुरु आम्हाला संकटात पाहू शकत नाहीत. सदगुरु या जगी आम्हाला कर्मांच्या चिखलपासून दुर राहण्याची शिकवण देण्यासाठी येतात, आम्ही कर्मांच्या चक्रव्यूहातून बाहेर पडावे, अशी त्यांची इच्छा असते, की ज्यामध्ये अडकून आपण पुन्हा पुन्हा या जगात येत असतो.

जीवन काळात देखील सद्गुरु आमचे अनेक प्रकारच्या संकटा पासून रक्षण करतात. ते आमच्यावर विविध प्रकारे करत असणाऱ्या कृपांचे, मदतीचे आम्हाला ज्ञान देखील नसते. जो पर्यन्त आम्ही परमात्म्या सोबत एकरूप होत नाही, तो पर्यन्त आमची हर प्रकारे मदत करण्यासाठी सद्गुरु सदैव आमच्या सोबत राहतात. एकदा का पुर्ण सदगुरुद्वारे नामदान मिळाले की सद्गुरु आपल्या शिवनेत्रावर विराजमान होतात व जीवनातील प्रत्येक घडामोडी मध्ये आमची मदत करतात.

सदगुरू हे आपले खरे निस्वार्थ मदतगार असतात, मदतीच्या बदल्यात कोणत्याही प्रकारचा मोबदला ,नाव किंवा कीर्ति त्यांना नको असते. ते आपल्याला मदत करतात, कारण ते आपल्या सर्वांवर प्रेम करतात, त्यांचे स्वतःचे अंतःकरण प्रभु प्रेमाने ओत प्रोत भरलेले असते.

आपल्याला पूर्ण सतगुरुंच्याच चरणी जावे लागेल. आपण परमेश्वराला प्रार्थना केली पाहिजे कि त्याने वर्तमान क्षणी सद्गुरुंच्या चरणी आम्हाला लवकरात लवकर घेउन जावे, जेणेकरून त्यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली आपण आपली आध्यात्मिक यात्रा शक्य तितक्या लवकर पुर्ण करू शकू आणि आपल्या निजधामी पोहचून कायमस्वरूपी परमात्म्यामध्ये लीन होऊ.

■ ■ ■

## गुरुपौर्णिमा : साधनेचा संकल्प!

**वाचक लिहितात**

आषाढ पौर्णिमेला गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. साधनेचा आरंभ करण्यासाठी हा अत्यंत शुभ दिवस मानला जातो. या दिवशी केलेला संकल्प दीर्घकाळ टिकतो, असे मानले जाते. साधना करताना गुरुकृपेशिवाय सर्व काही व्यर्थ आहे ! कारण श्रीगुरु आपल्या जीवनातील अंधःकाररूपी अज्ञान दूर करून ज्ञानरूपी प्रकाश देतात. ईश्वराचे सगुण रूप म्हणजेच श्रीगुरु !

गुरुकृपेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीच्या दिशेने वाटचाल होणे, यालाच ह्यगुरुकृपायोगह्ण असे म्हणतात. ह्यगुरुकृपायोगह्ण या योगाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग, भक्तीयोग अशा सर्व साधनामार्गांना सामावून घेणारा, असा हा ईश्वरप्राप्तीचा सहजसुलभ मार्ग आहे.

भगवंताचे नामस्मरण करणे, भगवंताच्या सतत अनुसंधानात राहण्यासाठी भाव जागृत करणे, सत्संगात राहणे, सत्सेवा करणे, ईश्वरप्राप्तीसाठी त्याग करणे, सर्व प्राणिमात्रांविषयी निरपेक्ष प्रेम असणे, अशा विविध टप्प्यांमधून साधना केल्यास निश्चितच लवकर गुरुकृपा प्राप्त होऊ शकते. म्हणूनच गुरुपौर्णिमेच्या दिवशी साधनेचा संकल्प करून सतत साधनारत राहण्याचा प्रयत्न करू या.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

# या ७ लोकांनी नाश्त्यात शिळी चपाती खाल्लीच पाहिजे? फायदे जाणून आश्चर्य वाटेल..



भारतीय स्वयंपाकघरात दररोज ताजी चपाती बनवणे ही एक सामान्य गोष्ट आहे. रात्री केलेल्यांपैकी काही चपात्या उरतात. त्या चपात्या काहीजण सकाळी गरम करून चहासोबत वैगरे खातात. पण काहीजण त्या फेकून देतात. पण शिळी चपाती खूप फायदेशीर ठरू शकते.

आयुर्वेद आणि घरगुती उपचारांमध्ये, शिळी चपातीला औषध म्हणून पाहिले जाते. विशेषतः काही विशेष वैद्यकीय परिस्थितीत, त्याचे चामत्कारिक परिणाम देखील पाहायला मिळतात. शिळी चपाती सात प्रकारच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या लोकांसाठी परिणामकारक घरगुती उपाय मानला जातो.

१. शिळ्या चपातीमध्ये असलेले कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स हळूहळू विघटित होतात, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढत नाही. सकाळी रिकाम्या पोटी थंड दुधात भिजवलेली शिळी चपाती खाल्ल्याने साखरेची पातळी नियंत्रणात राहते. मधुमेहाच्या रुग्णांना आराम मिळण्यासाठी प्राचीन काळापासून ही पद्धत अवलंबली जात आहे. त्यामुळे शरीराची ऊर्जा देखील टिकून राहते आणि भूक लवकर लागत नाही.

२. पोटात जळजळ, आंबट ढेकर किंवा ॲसिडिटीसारख्या समस्या असलेल्यांसाठी शिळी चपाती अमृतसारखी आहे. चपाती रोटी शरीराची उष्णता कमी करते आणि पोटाला थंडावा देते. दही किंवा थंड दुधासोबत शिळी चपाती घेतल्याने पोटातील उष्णता आणि ॲसिडिटी दोन्हीपासून आराम मिळतो.

३. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी जास्त मीठ आणि तेलकट पदार्थ खाणे टाळावे. जर शिळी चपाती मीठाशिवाय दह्यासोबत खाल्ली तर ती रक्तदाब नियंत्रित करण्यास प्रभावी ठरते.

४. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी शिळी चपाती फायबरचा एक उत्तम स्रोत आहे. शिळी चपाती खाल्ल्यनंतर भरपूर वेळापर्यंत भूक लागत नाही.जास्त खाण्याची सवय देखील कमी होते. ते पचन सुधारते आणि चयापचय गतिमान करते.

५. शिळी चपाती खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. शिळी चपातीमध्ये फायबरचे प्रमाणही जास्त असते. जे सहज पचते आणि पोट सहज साफ होण्यास मदत करते. दररोज सकाळी दही किंवा थंड दुधात भिजवून शिळी भाकरी खाल्ल्याने बद्धकोष्ठता दूर होते.

६. जर लवकर थकवा जाणवत असेल किंवा शरीरात ऊर्जा कमी असेल तर शिळी चपाती मदत करू शकते. त्यात असलेले पोषक घटक शरीराला ऊर्जा देतात आणि दिवसभर ताजेतवाने ठेवतात.


७. तोंडात अल्सर किंवा जळजळ होण्याची समस्या जास्त जाणवत असल्यास, दुधात भिजवलेली शिळी चपाती खाल्ल्याने अल्सरपासून आराम मिळतो.

**शिळी चपाती कशी खावी?**

रात्री उरलेली चपाती शक्यतो थंड जागी किंवा फ्रीजमध्ये झाकून ठेवा. सकाळी थंड दुधात किंवा ताज्या दह्यात भिजवून खा. चव वाढवण्यासाठी तुम्ही थोडे गूळ किंवा काळे मीठ देखील घालू शकता. चपाती १० किंवा १२ तासांपेक्षा जास्त जुनी नसावी आणि बुरशी किंवा आंबट वास नसावा. ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### (कु)तर्कवादी..!

**सकारात्मक तकार्ने**
**जीवनात होते प्रगती**
**कुतर्क करणाऱ्यांची**
**होत राहते फजिती ..!**

**ज्योतिषी वदले -**
**तुझा लकी नंबर चार**
**घरात होते मेंबर तीन**
**म्हणे तीगडे काम बिगडे**
**खरेच आहे हो हे गडे .. !**

**आई म्हणे बाळा -**
**लग्न करून घे बघ**
**होतील मेंबर चार**
**कारटं म्हणे तू-**
**थोड्या दिवसाची पाहूणी**
**पुन्हा तीनचाच पाढा तयार .**

## माजी विद्यार्थ्यांनी केला माजी मुख्याध्यापकाचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ९ जुलै :** घुग्घुस येथील अंदाजे ३ किलोमीटर अंतरावर नकोडा येथील तेलुगु शाळेतील माजी मुख्याध्यापक संम्बामूर्ती यांच्या ७७ वा वाढदिवस माजी विद्यार्थांद्वारे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम माजी विद्यार्थ्यांनी माजी मुख्याध्यापक संम्बामूर्ती सरांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आले.तसेच समोर वाटचालीस अभिनंदन करण्यात आले.घुग्घुसच्या वृद्धाश्रम येथे त्यांच्या केक कापण्यात आले.तसेच वृद्धाश्रमात फळ वाटप करण्यात आले. मार्गदर्शक सैय्यद सलीम सरकार उपस्थित होते.

## शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व खाजगी अनुदानित विजाभज, आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याकरीता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशनादरम्यान ११ जुलै २०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. चंद्रपूर कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात व विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात होत आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यासाठी धान खरेदीचे उद्दिष्ट वाढून १.९० लाख क्विंटल

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२४-२५ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय शासनाने घेतला आहे. जिल्ह्यासाठी यापूर्वी केवळ ९०,६८० क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. आता यामध्ये तब्बल एक लाख क्विंटल वाढ करून एकूण १,९०,६८० क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.



यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी खरेदी फेडरेशनकडे सविस्तर पत्राद्वारे मागणी केली होती.

या पत्रांमध्ये ँसि पोर्टलवरील शेतकरी नोंदणी, जिल्ह्यातील गरज, आणि शेतकऱ्यांचे नुकसान यांचा तपशीलवार आढावा देण्यात आला होता.

या ठोस मागणीच्या पार्श्वभूमीवर शासनाने सकारात्मक निर्णय घेतला असून चंद्रपूर जिल्ह्याच्या शेतकऱ्यांना आता वाढीव उद्दिष्टाचा थेट लाभ होणार आहे.

ही उद्दिष्टवाढ केवळ प्रशासनिक प्रक्रिया नसून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या शेतकरीहिताच्या संघर्षाचे ठोस फलित आहे.

यामुळे आता अधिकाधिक शेतकऱ्यांना किमान आधारभूत दराने आपले धान विक्री करता येणार असून त्यांना आर्थिक आधार मिळणार आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांचा ठाम पाठपुरावा आणि शासन दरबारी प्रभावी मांडणी यामुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना आज दिलासा मिळाला आहे, हे विशेष.

## धर्मांतरासंदर्भात विदेशी निधी, विशेष विंग व कायदा आवश्यक

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभेत मागणी

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी वाढत्या धर्मांतर प्रकरणांविषयी विधानसभेत आज अत्यंत महत्त्वाची मागणी केली. त्यांनी सरकारचे लक्ष वेधल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धर्मांतर रोखण्यासाठी राज्यात ठोस कायदा करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

मागील वर्षी महाराष्ट्रातील तब्बल १५१५ संस्थांना विदेशातून निधी प्राप्त झाला. हा निधी धर्मांतरासाठी वापरला जातो का? या संदर्भात विदेशी निधीचा तपशील अधिवेशनाअखेर पटलावर ठेवण्यात येईल का?, असे प्रश्न आ. मुनगंटीवार यांनी उपस्थित केले.

आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'गृह विभागावर मोठा ताण आहे. त्यामुळे अशा प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्यासाठी स्वतंत्र विंग स्थापन करावी. इतर राज्यांनी धर्मांतर रोखण्यासाठी कायदे केले आहेत, महाराष्ट्रानेही पावले उचलायला हवीत. सक्तीने किंवा आमिषाने होणाऱ्या धर्मांतर थांबविण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा असेही त्यांनी नमूद केले. या प्रश्नांना उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सुधीरभाऊंनी उपस्थित केलेले तिन्ही मुद्दे अत्यंत गंभीर आहेत. विदेशी निधीचा स्त्रोत, उपयोग याची चौकशी होईल, तसेच विशेष विंग स्थापनेचाही विचार केला जाईल. अन्य राज्यांनी केलेल्या कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्राने ठोस कायदा आणावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या तिन्ही मुद्द्यांवर मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत सखोल चर्चा करून, राज्यात धर्मांतर करण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही असा कायदा आणण्यासाठी प्रयत्न निच्छित करु असा विश्वास महसूल मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात दिला.

## वेकोलीने अधिग्रहण संदर्भात तत्काल सेक्शन ९ ची कारवाई करावी

### विरुर गाडेगावच्या ग्रामस्थांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** २२ मार्च २०१५ रोजी कोरपना तहसील मधील मौजा विरुर गाडेगाव येथे वेकोलीने ७२० हेक्टर जमीन संपादित केली. परंतु १०१ हेक्टर जमीन शिल्लक आहे. या काळात गावाचे पुनर्वसन करण्यात आले. अशा परिस्थितीत वेकोलीच्या काळ्या धुळीमुळे ग्रामस्थांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उर्वरित जमीन तात्काळ संपादित करून सेक्शन ९ ची अंमलबजावणी करण्याची कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत केली आहे. १५ दिवसांत मागणीचा विचार न केल्यास पैनगंगा प्रकल्पासमोर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

शामराम बांदुरकर म्हणाले की, २२ मार्च २०१५ रोजी वेकोलीने ७२० एकर जमीन संपादित केली. त्यानंतर गावाचे पुनर्वसनही करण्यात आले. परंतु अनेक वर्षे उलटूनही उर्वरित १०१ हेक्टर जमीन अद्याप संपादित झालेली नाही. गावात सध्या ५२ कुटुंबे आहेत. या कुटुंबांमध्ये एकूण २०० लोक राहतात. येथे सुरू असलेल्या




खाणकामामुळे गावात वेकोलीची काळी धूळ पसरत आहे. यामुळे कापूस आणि सोयाबीन पिकांचे नुकसान होत आहे. शेतात जाण्यासाठी रस्ता नाही. वेकोलीच्या पायऱ्यांमुळे पैनगंगा नदीचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात साचत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यात अडचणी येत आहेत. तसेच वेकोलीमुळे वन्य प्राण्यांची दहशत वाढली आहे. त्यामुळे ग्रामस्थांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे उर्वरित १०१ हेक्टर जमीन तात्काळ संपादित करण्याची मागणी पत्र परिषदेद्वारे करण्यात आली आहे. जर १५ दिवसांत कलम ९ अंतर्गत त्वरित कारवाई केली नाही तर पैनगंगा प्रकल्प कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

पत्र परिषदेत शामराव बादूरकर, पद्माकर ताजणे, कौशल्या ताजणे, सूरज वाघमारे, माधुरी ताजणे आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्य सीमेलगतच्या सोनुर्ली शेत शिवारात सोशल क्लब सुरु

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ जुलै :** महाराष्ट्र - तेलंगणा राज्य सीमेलगत असलेल्या सोनुर्ली गावालगतच्या शेत शिवारात सोशल क्लबच्या गोंडस नावाखाली जुगार अड्डा सुरू झाल्याची माहिती असून यात परवानगीच्या अटीशर्ती धाब्यावर बसविल्या जात आहे.

या क्लब मध्ये लगतच्या राज्यातील परप्रांतीय जुवारी खेळायला येत असल्याने शेत शिवारात काम करणाऱ्या महिलांमध्ये मोठा रोष पहायला मिळत आहे. राज्य सीमेलगतच्या सोनुर्ली - चिचबोडी मार्गातील एका शेतात सोशल क्लब सुरू झाला असून या क्लब मध्ये लगतच्या तेलंगणा व आंध्र प्रदेशातील जुवारी जुगार खेळण्यासाठी येत आहे.दररोज १० - १५ चारचाकी वाहनातून परप्रांतीय जुवारी येत असल्याने शिवारात तोबा गर्दी दिसून येत आहे.मुळात क्लबला परवानगी देताना अटी व शर्ती लादून दिल्या जाते.रात्री १० वाजेपर्यंतच क्लब सुरू ठेवता येतो.परवानगीत दिलेल्या ठराविक टेबल वर पत्ते खेळायची मुभा आहे.मात्र या नियमांला पाय दडी तुडवीत क्लब रात्रभर सुरू राहत असल्याची माहिती आहे.विशेष म्हणजे,सध्या शेतीचा हंगाम सुरू असल्याने महिला शेतात कामासाठी जात आहे.मात्र शेत शिवारात परप्रांतीय मोठ्या प्रमाणात राहत असल्याने महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक प्रशासनाने क्लब मध्ये काय सुरू आहे याची शहानिशा करून कारवाई करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने निःशुल्क मोतीबिंदू नेत्र तपासणी

### श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूर व शालीनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील बल्लारपूर येथे निःशुल्क मोतीबिंदू नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री माता कन्यका सेवा संस्था चंद्रपूर व शालीनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटर नागपूरच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरातील तपासणीमध्ये ज्यांना दृष्टीदोष आढळून आला त्यांच्यावर नागपूर येथे शालीनीताई मेघे हॉस्पीटलमध्ये शस्त्रक्रिया होणार आहे.

### रूग्णांनी मानले आ. मुनगंटीवार यांचे आभार

शिबिरात सहभागी झालेल्या रूग्णांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे. तपासणी, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया निःशुल्क उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. आतापर्यंत मुनगंटीवार यांनी ३५ हजारांवर नागरिकांवर मोफत चश्मे वितरीत केले व १५ हजारांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

श्री माता कन्यका सेवा संस्थेच्यावतीने नागपूर येथील शालीनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटरच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. दि. ५ जुलै रोजी बल्लारपूर तालुक्यातील संत गाडगेबाबा महाराज वाचनालय, सुभाष वार्ड, बल्लारपूर येथे ७६ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यातील १३ नागरिकांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच दि. ०६ जुलै रोजी विद्याश्री कॉन्व्हेंट, श्रीराम वार्ड, बल्लारपूर येथे १७६ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली.

यातील ४५ नागरिकांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शस्त्रक्रिया निःशुल्क करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या रूग्णांना चंद्रपूर येथून नागपूरला नेने व परत आणून सोडणे याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे वृक्षारोपण

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** आज दि. ०९ जुलैला डॉ. आंबेडकर विद्यालय ब्रम्हपुरी. येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम विद्यालयाच्या परिसरात घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. राजेशजी कांबळे व रिलायन्स बँक चे संचालक मनिष नागदेवे , यांच्या शुभहस्ते डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रह्मपुरी. येथे १५० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी मुख्याध्यापक व्ही .डब्लू. नन्नावरे ,पर्यवेक्षिका शेळके मॅडम, विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यालयातील स्काऊट गाईड पथक व एन.सी.सी पथक यांनी परिश्रम घेतले.



## नगर परिषद प्रशासनाचा अति दुर्लक्षपना !

### शहरातील ओंकार ले - आउट मधे पानीच पाणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ९ जुलै :** वारंवार शासकीय सेवेत असलेल्या नगर पालिका प्रशासनाला निवेदनात मागणी करून सुद्धा शहरातील ओंकार ले -आउट येथील खुल्या जागेवर नालीचे पाणी शिरत असल्याने येणाऱ्या पावसाळ्यात पावसाचे पाणी साचणार असल्याची माहिती मुख्याधिकाऱ्याला गेल्या दीड महिन्यापूर्वी निवेदनाद्वारे येथील वार्डवासी यानीं दिली होती. यावर उपाययोजना करण्याची मागणी सुद्धा केली होती, मात्र या समस्याकडे नगर प्रशासानाचे दुर्लक्ष केल्याने अखेर ले -आउट मध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी जमा झाल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे .

कुंभार बोडी ते विजासन मार्गे जाणाऱ्या नालीतील पाणी घोडमारे लान येथून मधातच ओंकार लेआउट मध्ये शिरत होते. ही समस्या पावसाळ्यात वाढणार याकरिता माजी नगरसेवक शोभा पारखी यांच्या नेतृत्वात दीड महिन्यापूर्वी वार्ड वासियांनी मुख्याधिकारी यांना या समस्येचे निवारण करण्याकरिता निवेदन दिले होते. त्यांनी यावर कोणतीही उपाय योजना केली नसल्याने ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या तीन दिवस येणाऱ्या सतत धार पावसामुळे ले -आउट मधील घरासमोर पाणी शिरल्याने मोठे डबके तयार झाले आहे. असेच पाणी वाढत राहिले तर् सभोवतालच्या घरात पाणी शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही. या समस्याकडे मुख्याधिकारी यानी जाणीवपूर्वक लक्ष देऊन या पाण्याची वाट मोकळी करून द्यावी, अन्यथा येणाऱ्या समस्येकडे नगरपालिकेला तोंड द्यावे लागणार आहे . सदर् निवेदन देताना ओंकार ले -आउट येथील माजी नगरसेवक शोभा पारखी ,वैशाली सैताने , मंदाताई पारखी , शांताबाई बेलखुडे ,सुवर्णा पारखी, वाघमारे उपस्थित होते

## पोंभूर्णा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभूर्णा, दि. ९ जुलै :** तालुक्यातील एकूण ३१ ग्रामपंचायतीच्या सन २०२५-२०३० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक सरपंच पदासाठी २०११ च्या जनगणनेनुसार आरक्षण दि. ८ जुलै मंगळवारला पोंभूर्णा येथील पंचायत समितीच्या वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले.

यावेळी अनुसूचित जाती प्रवर्गातील ३ पैकी १ महिला राखीव तर २ सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले.

सातारा भोसले येथे महिला राखीव असून बोर्डा बोरकर व जुनगाव येथे सर्वसाधारण ठेवण्यात आले आहे.

-अनु जमाती प्रवर्गातील ९ पैकी ४ महिला राखीव तर ५ सर्वसाधारण आरक्षित ठेवण्यात आले आहेत.महिला राखीव असलेल्या ग्रामपंचायतमध्ये घाटकुळ, वेळवा माल,आष्टा,

दिघोरी येथे महिला राखीव आहे तर पिपरी देशपांडे,चेक फुटाणा,फुटाणा मोकासा,बोर्डा झुल्लूरवार,चेक बल्लारपूर येथे सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले आहे.

-ना.मा.प्र.साठी ८ पैकी ४ महिला तर ४ सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले आहे. घनोटी तुकूम, नवेगाव मोरे,थेरगाव (रै.),चेक ठाणा येथे महिलासाठी राखीव ठेवण्यात आले आहे तर चिंतलधाबा,घोसरी,देवाडा (बु.),चेक हत्तीबोडी याठिकाणी सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले आहे.

-सर्वसाधारण प्रवर्गातील ११ पैकी ६ महिला राखीव तर ५ सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले आहेत. महिला राखीव असलेले ग्रामपंचायत देवाडा खुर्द,जामखुर्द,मोहाळा (रै.),

कसरगट्टा,भिमणी,केमारा या ग्रामपंचायतीचा समावेश आहे तर चेक ठाणेवासणा,चेक आष्टा, आंबेधानोरा,उमरी पोतदार, जामतुकूम याठिकाणी सर्वसाधारण आरक्षित करण्यात आले आहे.

### १५ ग्रामपंचायतीवर महिला सरपंच राज

यावेळी कसरगट्टा येथील काही ग्रामस्थांनी कसरगट्टा ग्रामपंचायतला अनु.जातीसाठी आरक्षण न मिळाल्याने आक्षेप घेतला आहे. १९६२ ला कसरगट्टा येथे ग्रामपंचायतची स्थापना झाली असून स्थापनेपासून आजपर्यंत ओ.बी.सी. प्रवर्गाला ७ वेळा एस.टी. प्रवर्गाला ८ वेळा सरपंच पदाचे आरक्षण मिळालेले आहे.या गावात अनु.जातीची लोकसंख्या क्रमांक तीन वर येत असताना सुद्धा अनु.जातीला एकदाही आरक्षण न मिळाल्याने आक्षेप घेण्यात आला आहे.याबाबत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी एकनाथ ऊराडे,रोशन दुर्गे, संतोष कवठे उपस्थित होते.

## कोळसा उत्खननामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर - शेतपिक, शेतजमिनी आणि घरेही बाधित : आ. किशोर जोरगेवार

### कोल वॉशऱ्यांमुळे सर्वाधिक नुकसान, सभागृहाचे वेधले लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जुलै :** राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कोळसा उत्खननामुळे गंभीर प्रदूषणाच्या समस्या निर्माण झाल्या असून, या प्रदूषणाचा परिणाम केवळ हवेत किंवा पाण्यात मर्यादित न राहता शेतजमिनींवर आणि घरांवरही मोठ्या प्रमाणात होत आहे. नागरी वस्तीमध्ये असलेल्या कोल वॉशऱ्या प्रदूषणाचे मोठे कारण ठरत असून, या कोळसा वॉशऱ्या बंद कराव्यात, अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.



कोल वॉशऱ्यांजवळील शेतजमिनींवर थेट परिणाम होत असून, पिकांचे नुकसान, जमिनीची सुपीकता कमी होणे, सिंचनासाठी वापरले जाणारे पाणी दूषित होणे असे गंभीर परिणाम स्थानिक शेतकरी आणि नागरिक भोगत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी वेकोलीमुळे चंद्रपूरात होणाऱ्या प्रदूषणाकडे आणि त्यामुळे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानीकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, या विषयावर संबंधित कोळसा उत्पादक जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींशी चर्चा केली आहे.

कोळशाचा सर्वात मोठा ग्राहक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी) असल्याने अनेक कोल वॉशऱ्यांची निर्मिती झाली असून त्या शेतीप्रधान भागात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढवत आहेत. विशेष म्हणजे पॉवर प्लांट आणि डब्ल्यूसीएलपेक्षाही वॉशऱ्यांचे प्रदूषण अधिक गंभीर असल्याचे निदर्शनास आले आहे.

या वॉशऱ्यांजवळील शेती क्षेत्र, जमिनीची सुपीकता आणि उत्पादनक्षमता यावर प्रतिकूल परिणाम होत असून, प्रदूषित पाण्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

### जिल्ह्यातील २१४ मुली व महिला बेपत्ता

चंद्रपूर जिल्ह्यात अल्पवयीन मुली आणि महिलांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असल्याचा गंभीर मुद्दा विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थित केला. यावेळी मागील अडीच वर्षांची आकडेवारी सभागृहात सादर करताना दररोज सरासरी तीन मुली अथवा महिला बेपत्ता होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यातील काहींचा शोध लागलेला असला तरी एकूण २१४ महिला आणि मुली अद्यापही बेपत्ता असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. याप्रसंगी ते म्हणाले की, सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांचा अपरिचित व्यक्तींशी संपर्क येत असून त्याचा गैरवापर केला जात आहे. काही लोक सोशल मीडियावरून महिलांना फसवून, त्यांच्याशी ओळख वाढवून, त्यांना चुकीच्या मार्गाने वेगवेगळ्या राज्यात पाठवून फसवत आहेत. मागील अडीच वर्षांच्या काळात २ हजार ७३० महिला व मुली बेपत्ता झाल्या आहेत. यामध्ये २ हजार ३०१ महिला आणि ४३९ अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. यातील अनेकांचा शोध लागला असला तरी अद्यापही २१४ महिला व मुली बेपत्ता असल्याचे वास्तव त्यांनी सभागृहात मांडले. या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा तसेच बेपत्ता महिलांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.

## नगर परिषद घुग्घुस तर्फे ‘स्वच्छता अपनाओ बिमारी भगाओ’अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ९ जुलै :** घुग्घुसच्या हद्दींतर्गत स्वच्छ भारत अभियान तथा स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी यांच्या संयुक्त विद्यमाने १ जुलै ते ३१ जुलै पर्यंत ‘सफाई अपनाओ बिमारी भगाओ’ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात स्वच्छतेचे ६ मंत्र देण्यात आलेले आहेत.

**स्वच्छ हात :** आपले दैनदिन काम झाल्यावर वेळोवेळी आपले हात स्वच्छ साबणाने किंवा नी स्वच्छ धुवून घ्यावे. जेणेकरून आपल्याला कोणत्याही आजाराची लागण होणार नाही.

**स्वच्छ घरे :** आपले घर स्वच्छ झाडून, जंतुनाशकाने आपले घर स्वच्छ पुसून काढावे घराच्या आजूबाजूला पाण्याचे डबके साचू देवू नये, परिसराला स्वच्छ ठेवावे. कचऱ्याचे ढीग जमा करू नये कचरा वेगवेगळा (ओला, सुका) नगर परिषद कचरा संकलन वाहनात टाकून द्यावे.

**स्वच्छ शौचालये :** आपले घरातील तसेच सार्वजनिक शौचालयाचे वापर केल्यावर मुबलक प्रमाणात पाणी टाकावे व स्वच्छ ठेवावे.

**स्वच्छ परिसर :** आपल्या घराच्या आजू बाजूचा परिसर स्वच्छ करून घ्यावे कचरा जमा करू नये.

**स्वच्छ नाले आणि जलसाठे :** आपल्या घरासमोरील तथा सार्वजनिक नालीमध्ये कचरा टाकू नये, शौच व इतर तत्सम घाण टाकू नये अन्यथा त्याचे वाईट परिणाम आपल्यास भोगावे लागतात.

**स्वच्छ सार्वजनिक जागा :** सार्वजनिक परिसराची स्वच्छता राखण्यास नगर परिषदेची मदत करावी. कचरा कचरापेटीतच टाकावे. मेलेली जनावरे, उरलेले अन्न, भाजीपाला इत्यादी कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये. सदर कचऱ्याने आजूबाजूला रोगराई पसरू शकते करिता आपले आरोग्य जपण्यास सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवावे. अशा प्रकारे सुचना दिल्या आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# अपमानातून चार कोटींची देणगी !

मुलीने वारसा हक्कावरून केलेला अपमान सहन न झाल्याने लष्करातून निवृत्त झालेले जवान एस विजयन यांनी त्यांची चार कोटी रुपयांची संपत्ती एका मंदिराला दान केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना तामिळनाडूच्या तिरुवन्नामलाई जिल्ह्यातील आहे. या जिल्ह्यातील अरुलमिगु रेनुगांबल अस्मान मंदिराला त्यांनी ही देणगी दिली आहे.

मुलीने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्यामुळे आणि दुखावल्यामुळे आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. याआधी त्यांचे मुलीसोबत वारसा हक्कावरून अनेकदा वाददेखील झाले होते. मात्र वडिलांनी रागाच्या भरात ही संपत्ती मंदिराला दान केली. त्यानंतर आता कुटुंबीयांनी ही संपत्ती परत मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. निवृत्त लष्करी जवान विजयन हे अराणी शहराजवळ असणाऱ्या केशवपुरम या गावातील रहिवासी आहेत. ते त्यांच्या दोन मालमत्तांची कागदपत्रे घेऊन मंदिरात गेले होते. यामध्ये मंदिराजवळ असणारी एक मालमत्ता



तीन कोटींची असून दुसरी मालमत्ता एक कोटी रुपयांची आहे. मंदिरातील कर्मचाऱ्यांनी २४ जून रोजी दानपेटी उघडली असता त्यांना या दानपेटीत ४ कोटी रुपये किंमतीच्या मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली.

मंदिर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांने सांगितले, की दर दोन महिन्यांनी आम्ही दानपेटी उघडून भाविकांनी दिलेले दान मोजतो. ही आमची नियमित परंपरा आहे. मंदिरात एकूण ११ दानपेट्या आहेत. अशाच एका मोजणीवेळी त्यांनी मंदिराच्या समोरच्या बाजूला ठेवलेली दानपेटी उघडली असता त्यांना त्यात नाणे आणि नोटांसोबतच मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली. त्यांना ही कागदपत्रे पाहून धक्का बसला. या कागदपत्रांसोबत एक चिठ्ठीदेखील त्यांना सापडली. त्यात ते स्वच्छेने ही संपत्ती मंदिराला दान करत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान त्या ठिकाणी अशी घटना घडण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे मंदिराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की अशी कागदपत्रे दानपेटीत टाकून संपत्ती आपोआप मंदिराची होत नाही. दान करायचे असेल तर त्यांनी अधिकृतपणे विभागाकडे नोंदणी करावी.

## कॅलिडोस्कोप

# नशीबवान आई-वडील

मुलांना प्रगती करताना पाहण्याचा आनंद हा पालकांसाठी सर्वात मोठा असतो. प्रत्येक पालकांना त्यांचा मुलगा किंवा मुलगी आयुष्यात त्यांच्यापेक्षा मोठे नाव आणि स्थान मिळवते तेव्हा सार्वधिक आनंद होत असतो. असाच एक प्रसंग इंडिगो विमानात घडला. एक एअर होस्टेस मुख्य केबिन क्रू म्हणून विमानात नियुक्तीला असताना तिचे पालक या विमानात चढले. त्यावर तिची कृती भारावून टाकणारी आहे. तिच्या पालकांना पाहून एअर होस्टेस भावूक झाली.

विमानातील या दृश्यातून या मुलीचे तिच्या पालकांबद्दलचे प्रेम आणि आदर दिसून येतो. मुलीची प्रगती पाहून पालकांच्या डोळ्यात आनंद दिसून येतो. एअर होस्टेस फ्लाइटमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रवाशांचे स्वागत करत असते. त्याच वेळी एअर होस्टेसची आई विमानात प्रवेश करते. आईला पाहून एअर होस्टेस आनंदी होते आणि तिच्या पाया पडते. त्यानंतर दोन्ही हात आई तिच्या डोक्यावर ठेवते. त्यानंतर तिचे वडील फ्लाइटमध्ये



चढतात. एअर होस्टेस त्यांच्याही पाया पडते. फ्लाइटमध्ये एअर होस्टेसच्या ड्रेसमध्ये आपल्या मुलीला पाहून दोन्ही पालक भावुक होतात.




# इथल्या रस्त्यांना नावंच नाहीत!

शहर असो किंवा गाव, प्रत्येक चौकाला, रस्त्याला वेगवेगळी नावं दिली जातात. भारतासारख्या देशात तर नावांवरून सतत वाद सुरू असतो. राजकारणी, स्वातंत्र्यसैनिक, विविध क्षेत्रातल्या कर्तबगार व्यक्ती यांची नावं रस्त्यांचा, चौकांना देण्याचा प्रघात आहे. अर्थात अशा नावांशिवाय कोणताही पत्ता पूर्ण होणार नाही. मात्र जर्मनीमधल्या एका ठिकाणच्या रस्त्यांना नावंच नाहीत. जर्मनीमध्ये हिलगर्मिसन नावाचं एक ठिकाण आहे. इथे गेल्यावर पत्ता कसा विचारायचा असा प्रश्न कोणालाही पडेल. इथे रहाणाऱ्या काही नागरिकांना या बिननावांच्या रस्त्यांमुळे बराच त्रास होतो. पत्ता काय सांगायचा असा प्रश्न त्यांना पडतो. याच कारणामुळे २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यात इथे मतदानाचं आयोजन करण्यात आलं होतं. रस्त्यांना नावं द्यायची किंवा नाही याचा निर्णय मतदानाद्वारे होणार होता. इथल्या लोकांनी रस्त्यांना नाव न देण्याच्या बाजूने मतदान केलं. हिलगर्मिसन हे गाव १९७० च्या दशकात वसवण्यात आलं. इथल्या घरांचे पत्ते फक्त घर क्रमांक आणि गावाचं नाव एवढ्यापुरतेच मर्यादित आहेत. या गावाची लोकसंख्या अवघी २२०० इतकी आहे. मात्र या लोकांना नाव नसण्याची पद्धत पुढे सुरू ठेवायची आहे.

# चार आण्याची कोंबडी, बारा आण्याचा मसाला!

भारतात गाड्यांसाठी व्हीआयपी नंबर प्लेट्सची क्रेझ सवश्रुत आहे. कार किंवा बाईकचे मालक चांगली आणि त्यांना हव्या असलेल्या नंबरची नंबर प्लेट आपल्या गाड्यांना लावतात. त्यासाठी ते कारच्या किंमतीत पाच टक्के जास्त रक्कम खर्च करत असतात. मात्र टू व्हीलरसाठी व्हीआयपी नंबर मिळवण्यासाठी एका व्यक्तीने लाखो रुपये खर्च केल्याचे कधी तुम्ही ऐकले का? हो ते खरे आहे.

हिमाचल प्रदेशमध्ये सोलनच्या संजीव कुमार यांनी त्याच्या बँकेत असलेली एफडी मोडली. त्यांनी नवीन होंडा ॲक्टिव्हा या एक लाख रुपयाच्या स्कूटरसाठी व्हीआयपी नंबर प्लेटवर तब्बल १४ लाख रुपये खर्च केले. संजीव त्यांच्या ॲक्टिव्हाच्या व्हीआयपी नंबरमुळे संपूर्ण परिसरात सगळ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरले आहेत.

एका व्यक्तीने एक लाख रुपयाची स्कूटर घेतली आणि १४ लाख रुपये हे फक्त व्हीआयपी नंबरसाठी खर्च केले. व्हीआयपी नंबर प्लेट एचपी २१सी-०००१ चे ते मालक आहेत.

नंबर प्लेटचा लिलाव

दरम्यान, त्यांचा मुलगा दिनेश कुमार म्हणतो, वडिलांना पूर्णपणे वेगळा नंबर हवा होता. त्यांनी ही गाडीची खास नंबर प्लेट मिळवण्यासाठी हिमाचल प्रदेशच्या परिवहन विभागाच्या अधिकृत



वेबसाइटवर अर्ज केला आणि लिलाव ठेवण्यात आला. ऑनलाइन लिलावात शेवटी दोन जणांमध्ये स्पर्धा होती. दुसऱ्या व्यक्तीने १३.५ लाख रुपयांची बोली लावली होती; पण कुमार यांनी त्या नंबरसाठी ५०००० रुपये जास्त देऊन ती बोली जिंकली. ही नंबर प्लेट आता देशातील सगळ्यात महागडी नंबर प्लेट बनली आहे.



# सिंहासनावर बसा, भरपूर पैसे कमवा!

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये तयार करण्यात आलेलं एक सिंहासन सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. हे सिंहासन २.५ इंच बुलेटप्रूफ जॅकेटपासून तयार करण्यात आलं आहे. या सिंहासनाचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे काचेच्या आत असणाऱ्या नोटा. या नोटा सुमारे एक लाख डॉलर्स म्हणजे सात कोटी रुपये किंमतीच्या असल्याचं बोललं जात आहे. या सिंहासनावर सर्वसामान्य बसू शकतात. 'एक्स १० मनी थ्रोन' या नावाने हे सिंहासन ओळखलं जाणार आहे. रशियन पॉपस्टार ॲलेक्सी सर्गियेंको आणि उद्योजक इगोर राइबाकोव यांनी हे सिंहासन तयार केलं आहे. आता हे पैशांचं सिंहासन तयार करण्यामागचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. या दोघांनी एका वेगळ्या उद्देशाने हे सिंहासन तयार केलं आहे. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांना पैशांचं महत्त्व कळेल आणि जास्तीत जास्त पैसे कमवण्याची प्रेरणा मिळेल, असं ॲलेक्सी आणि इगोरचं म्हणणं आहे. रशियातले लोक श्रीमंत व्हावेत, असं या दोघांना वाटतं. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांनी पैसे कमावण्याचा गांभिर्याने विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

# घोडी पळाली नवऱ्याला घेऊन!

लग्नाच्या हंगामात प्रत्येक वरात काहीतरी वेगळी असते. काही ठिकाणी नवरदेव हेलिकॉप्टरने येतो, तर काही फिल्मी शैलीत नाचतात. एक घटना मात्र थोडी वेगळीच आहे. नवरदेव घोडीवर बसला होता, बँड



वाजत होता, नातेवाइक नाचत होते आणि सर्व काही शाही शैलीत सुरू होते. तथापि नंतर असे काही घडले ज्याचा कोणी विचारही केला नसेल. सगळ्यांचा नाच सुरू असताना एक फटाका मोठ्या आवाजात फुटला आणि घोडी वरासह गर्दी असलेल्या वरातीतून धावत सुटली. यामुळे काही काळ वरातीत गोंधळ उडाला.

लग्नाची मिरवणूक पूर्णपणे शाही शैलीत सजवलेली होती. वर पारंपारिक पोशाखात घोडीवर स्वार होता आणि वऱ्हडी मंडळी बँडच्या तालावर नाचत होते. घोडीदेखील संगीतावर हलकेच नाचत होती. पण नंतर उत्साहात एका खोडकर वऱ्हाडीन मोठा फटाका वाजवला. या मोठ्या आवाजाने घोडी खूप घाबरली आणि वराला घेऊन पळून गेली. घोडीचा वेग इतका होता की काही सेकंदात ती दिसेनाशी झाली. वराला खाली उतरण्याचीही संधी मिळाली नाही. काही लोकांनी धावत तिला पकडण्याचा प्रयत्न केला. पण घोडी फक्त धावत राहिली.

फटाक्यांच्या आवाजाने घोडी पळून गेली ही संपूर्ण घटना कोणीतरी मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. नंतर वर तिच्या पाठीवरून खाली पडला. घोडी मात्र हाती लागली नाही.

# जॉयनिंगच्या दिवशीच सोडली नोकरी!

कोणी नोकरीच्या शोधात असतो तेव्हा नोकरी मिळणे ही त्याच्यासाठी मोठी गोष्ट असते. पण नोकरीवर रुजू झाल्यावर आणि काम सुरू केल्यावर बरेचदा अनेक लोक निराश होतात. काम त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नसते किंवा त्यांना ते काम आवडत नाही. बरेचदा लोक त्यांच्या इच्छा दाबून पगारासाठी नोकरी करत राहतात. तर काही लोक अशा परिस्थितीतून पुढे जातात आणि नोकरीचा राजीनामा देतात. पण लोक त्यासाठी थोडा वेळ घेतात, पण एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशीच नोकरी सोडली आहे.

नोकरी सोडल्यानंतर, या कर्मचाऱ्याने कंपनीच्या 'एचआर'शी संवाद साधला. तो आता 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. कोणीही पहिल्या दिवशी नोकरीवर जातो तेव्हा पहिला दिवस फक्त कामाबद्दल जाणून घेण्यातच जातो. दोन-तीन दिवसांत एखाद्याला त्याचे काम व्यवस्थित समजते. पण 'सोशल मीडिया'वर व्हायरल होणारी बाब ही त्यापेक्षा वेगळीच आहे. येथे एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशी नोकरीचा राजीनामा दिला आहे. यानंतर, कंपनीच्या एचआरने त्या कर्मचाऱ्याशी बोलून नोकरीच्या पहिल्याच दिवशी राजीनामा देण्याचे कारण जाणून घेतले.

कर्मचारी आणि 'एचआर'मधील संभाषणाचा स्क्रीनशॉट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. त्यात कर्मचारी म्हणतो, की मी आता पुढे जाऊ शकत नाही. मग 'एचआर' याचे कारण विचारतो. उत्तरात कर्मचारी म्हणतो, 'मला हे काम माझ्यासाठी योग्य वाटले नाही.' मग एचआर विचारतो 'काय योग्य वाटले नाही, ते मला सांगाल का?' कर्मचारी म्हणतो, की कोणतेही काम एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यानंतर 'एचआर' त्या कर्मचाऱ्याला सांगतो, 'तुम्हाला एका दिवसात काय समजले, तुम्हाला कामात काय आवडले




नाही?' मग कर्मचारी म्हणतो, 'मला काम अजिबात आवडले नाही.' यानंतर खुशी चौरसिया नावाच्या 'एचआर'ने तिच्या लिंक्डइन अकाउंटवर ही संपूर्ण घटना शेअर केली आहे. त्यात तिने लिहिले आहे, कोणीही एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यासोबतच तिच्या पोस्टमध्ये तिने नोकरीत सामील होणाऱ्या लोकांसाठी विशेष सल्लाही दिला आहे.




# चहाबाज घोडा

चहा म्हणजे अनेकांसाठी जीव की प्राण. गरमागरम वाफाळता चहा समोर आल्याशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरूवात होत नाही. या जगात चहाबाज माणसांची कमतरता नाही. पण लंडनमधल्या मर्सीसाइड पोलिसांच्या ताफ्यातला एक घोडा कमलीचा चहाबाज आहे. या घोड्याला चहाचं व्यसनच जडलं आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. जॅक नावाचा हा घोडा २० वर्षांचा आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून तो नियमितपणे चहा पितो. जॅकला सकाळी तबेल्यातच चहा लागतो. चहा प्यायल्याशिवाय त्याला तरतरी येत नाही. जॅकच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. चहा प्यायल्याशिवाय तो कामाला जात नाही. जॅक पुढच्या वर्षी निवृत्त होणार आहे. पाच वर्षांचा असल्यापासून जॅक चहा पितो. मालकाच्या कपमधला उरलेला चहा चाटायची सवय त्याला लागली होती. मग या चहाने त्याला वेडंच करून टाकलं. ही सवय आता त्याच्या अंगात भिनली आहे. जॅक जीभ कपात बुडवून चहा पितो. मर्सीसाइड पोलीसही त्याला नियमित चहा देतात. जॅकचे सगळे लाड पुरवतात. जॅकचे चोचले अजिबात कमी नाहीत. त्याला गरम किंवा सायीचा चहा चालत नाही. पूर्ण दुधाचा एक चमचा साखर आणि थोडं थंड पाणी घातलेला चहा त्याला आवडतो. पण चहात जास्त साखर असेल तर तो खूप खूश होतो. चहा पिणाऱ्या जॅकचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याच्या या व्हिडिओला दोन लाख रुपयांपेक्षा जास्त लाईक्स मिळाले आहेत.

# ...आणि तिचं स्वप्नं पूर्ण झालं

प्रत्येक माणसाचं काही ना काही स्वप्न असतं. कोणाला घर घ्यायचं असं तर कोणाला गाडी खरेदी करायची असते. कोणी जगभ्रमंतीची स्वप्नं रंगवत असतं. आता ही स्वप्नं पूर्ण करायची तर गाठीला पैसे हवेत. पैशांची जमवाजमव करण्यासाठी लोक बरीच मेहनत करतात. विविध मार्गांनी खर्चात कपात केली जाते आणि अखेरीस हे स्वप्न पूर्ण होतं. हे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद वेगळाच असतो. अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये रहाणारी एड्रिना एडवर्डस 'डेनीस' रेस्टॉरंटमध्ये वेटरचं काम करते. एड्रिनाला गाडी घ्यायची होती. गाडी घेता यावी म्हणून ती कार्यस्थळी चालत जात असे. एड्रिनाच्या कामाचं ठिकाण तिच्या घरापासून जवळ नव्हतं. एड्रिनाला तब्बल २२ किलोमीटर अंतर कापावं लागायचं. रेस्टॉरंटमधून घरीही ती पायीच यायची. एड्रिना जवळपास पाच तास चालायची. या रेस्ट्रॉरंटमध्ये आलेल्या एका जोडप्याला एड्रिनाबद्दल कळलं. त्यांनी एड्रिनाचं स्वप्न पूर्ण करायचं ठरवलं. हे जोडपं रात्री पुन्हा आलं. त्यावेळी त्यांच्या हातात नव्या कोऱ्या गाडीची चावी होती. त्यांनी ही गाडी एड्रिनाला दिली. गाडी बघून एड्रिना खूप खूश झाली. पाश्चात्य देशांमध्ये 'थँक्स गिव्हिंग'ची परंपरा आहे. यानिमित्ताने आपल्याला गाडी



देण्यात आल्याचं एड्रिनाला वाटलं. या गाडीचे पैसे द्यायचे असतील तर गरजवंतांची मदत कर, असंही या जोडप्याने एड्रिनाला सांगितलं. या नव्या गाडीमुळे एड्रिनाचे कष्ट कमी होणार आहेत.

# पूर्व विदर्भात पाणीबाणी

**भंडारा जिल्ह्याला मोठा फटका**
**गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात नुकसान**
**अनेक मार्गावरील वाहतुक बंद**
**कित्येक भागात पुरपरिस्थिती**





सर्व छायाचित्र भंडारा जिल्ह्यातील पूर परिस्थितीची आहेत.

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** विदर्भात विशेषतः पूर्व विदर्भाच्या काही जिल्ह्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नागपूर, वर्धा जिल्ह्यातील शाळांना मुसळधार पावसामुळे आज सुट्टी जाहीर करण्यात आली होती. नागपूरमध्ये अनेक भागात पाणी साचले असून, भंडारा शहरासह जिल्ह्यात रविवारी रात्रीपासून सुरु झालेल्या संततधार पावसाचे तांडव सुरू आहे.

भंडारा जिल्ह्यात गेल्या २४ तासात ११४.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. बुधवारी सकाळपासून पावसाने दमदार बरसने सुरू केले. या अतिवृष्टीने भंडारा शहरासह जिल्ह्यातील नदी काठावरील गावात पूर स्थिती निर्माण झाली आहे.

मागील चार दिवसांपासून भंडारा जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून मंगळवारच्या रात्रीपासून पावसाचा जोर वाढला आणि भंडारा जिल्हावासियांची झोप उडाली. सलग १२ तासांपासून पडत असलेल्या धो-धो रस्ते पाण्याखाली गेले. नदी, नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. गावा-खेड्यात, सोसायटी व वस्ती भागात पाणी घुसल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. भंडारा, तुमसर, मोहाडी, साकोली व लाखांदूर तालुक्यातील काही गावात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

अतिवृष्टीमुळे शहराच्या हाकेवर असलेला कारधा जुना पूल पाण्याखाली बुडाला. शहर आऊटरच्या सखल भागात पाणी साचले असून पुराचा वेढा बसल्यासारखी स्थिती आहे.

गणेशपूर, भोजापूर, मेंढा व समतानगर फेज दोन भागातील नाल्यांना प्रचंड उफान आला आहे. सलग चार दिवस सुरू असलेल्या पावसाने भंडारा शहरातील खात रोड, शास्त्री चौक, भोजापूर याठिकाणी पाणी साचले आहे. तर लाखांदूर तालुक्यातील राजनी गावातील ग्रामपंचायतमध्ये पाणी घुसल्याने ग्रा. पं. मधील कागदपत्रे ओली झाली आहेत. तसेच तालुक्यातील विरली (बु.) येथे घरांची पडझड झाली आहे.

तुमसर तालुक्यातील पाथरी येथे कोसळलेल्या मुसळधार पावसाने एका शेतकऱ्याचे घर जमीनदोस्त झाले. पांडू मारबते यांचे कच्चे घर ढिगाऱ्यात परिवर्तित झाले. पावसाने जिल्ह्यातील गावागावातील जनजीवन विस्कळीत करून टाकले आहे. नदी- नाले भरून वाहत असून अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. त्यामुळे जिल्ह्यात मुसळधार सरी, जलमय भंडारनगरी अशी स्थिती असून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

चुल्हाड (सिहोरा) नजिक बावनथडी नदीवर बांधकाम करण्यात आलेल्या महाराष्ट्र - मध्य प्रदेश आंतरराज्यीय पुलावरून मंगळवारी सकाळपासून वाहतूक बंद करण्यात आली आहे. बाउनथडी नदीच्या पुराच्या पातळीत वाढ होत असल्याने सिहोरा गावाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासन पूर परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

**नदीच्या पुलावर पाणी**

नागपूर जिल्हाच्या कळमेश्वर तालुक्याच्या धापेवाडा ते पाटणसावंगी राज्य मार्गावरील ब्रह्मपुरी गावाजवळील चंद्रभागा नदीच्या पुलावर तसेच पाटणसावंगी गावाजवळील कोलार नदी पुलावर पाणी आले आहे. त्यामुळे या दोन्ही पुलावरची वाहतूक बंद करण्यात आलीय.

**गोंधळीचा संपर्क तुटला**

यवतमाळ जिल्ह्यातल्या गोंधळी गावाला पाण्याचा वेढा पडला आहे. गोंधळी, किन्ही, बागवाडी, सरूळ, परसोडी, खर्डा इत्यादी भागात झालेल्या पावसामुळे नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. नदीला जोडणाऱ्या गोंधळी जवळील नाल्याचा जलस्तर सुद्धा वाढला असून, त्यामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. किन्ही-गोंधळी रस्त्यावर पाणी साचून ते गावात शिरल्याने गोंधळीचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे.

**चारजण अडकले**

हिंगणघाट तालुक्यातील चानकी येथे यशोदा नदीला आलेल्या पुरामुळे चार लोक अडकले आहेत. रस्त्याच्या कामाकरीता आलेले लोक तेथे झोपडी बांधून राहत होते. रात्रीपासून सुरु असलेल्या पावसामुळे पाणी पातळीत वाढ झाली. नागरिकांना रेक्यू करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथक पोहोचलं आहे. हिंगणघाट तहसीलदार आणी अधिकारीसुद्धा घटनास्थळी पोहोचले आहेत.

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे शहरात पावसाचे पाणी साचल्याने भुयारी मार्ग बंद करण्यात आला.

## अकोला, वाशीम जिल्ह्यात संततधार

अकोला, वाशीम जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. सर्वत्र जलमय वातावरण झाले. सखल भागामध्ये पाणी साचले असून पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. आणखी सात दिवस पावसाचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे. रिमझिम पडणारा पाऊस खरीप हंगामातील पिकांसाठी पोषक ठरत आहे. आणखी पाऊस पडल्यास शेतामध्ये पाणी साचून दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता आहे. अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने मुक्काम ठोकला. सुरुवातीला मुसळधार पाऊस कोसळल्यानंतर दोन दिवसांपासून रिमझिप पाऊस सुरू आहे. सूर्यदर्शन झाले नाही. काही ठिकाणी पावसाने जोर पकडला. ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचले आहे. नागरिकांच्या घरामध्ये रस्ते, नाल्यातील पाणी शिरले. हा पाऊस पिकांसाठी फायदेशीर ठरू शकतो. मात्र, आता काही दिवस उघाड पडण्याची गरज आहे, मात्र जिल्ह्यात १५ जुलैपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली. सतत पडणाऱ्या पावसामुळे नदी, नाले व तळ्यांतील पाणी साठ्यात वाढ झाली. जिल्ह्यातील पूर्णा, मोर्णा, निगुर्णा, काटेपूर्णा, मन, पठार, गौतमा आदी नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला. अकोला जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी २४.१ मि.मी. पावसाची नोंद झाली.

वाशिम जिल्ह्यात गेल्या २४ तासांमध्ये सरासरी १४.९ मि.मी. पाऊस झाला आहे. सर्वाधिक कारंजा तालुक्यात २१.८ मि.मी. पाऊस झाला. वाशीम तालुक्यात ९.३ मि.मी., रिसोड ९ मि.मी., मालेगाव १७.०५ मि.मी., मंगरुळपीर १७.४ मि.मी., मानोरा १३.१ मि.मी. पाऊस झाला. या महिन्यात वाशीम जिल्ह्यामध्ये ८९.८ मि.मी. पावसाची नोंद झाली.

## कचरावेचकांच्या मुलांचे भवितव्य घडविणारी संस्था ACORN इंडिया फाउंडेशन



ACORN इंडिया फाउंडेशन २००८ पासून मुंबईतील धारावी परिसरात काम करत आहे. धारावी ही सर्वात मोठी कामगार वसाहतींपैकी एक आहे आणि येथे ७ ते ८,००,००० लोकसंख्येची लोकसंख्या आहे. मुंबईतील सुमारे ५०% सुक्या कचऱ्याची हाताळणी करणारे हे भारतातील सर्वात मोठे पुनर्वापर केंद्र आहे.

ACORN फाउंडेशन हे ॲड. विनोद शेट्टी यांनी स्थापन केलेले नोंदणीकृत ना-नफा सार्वजनिक ट्रस्ट आहे. महिला संशोधन आणि कृती प्रकल्प हा ८० जी प्रमाणपत्र आणि FCRA अनुपालन असलेला नोंदणीकृत ट्रस्ट आहे.

धारावीसारख्या अनौपचारिक वस्त्यांमध्ये समाजातील दुर्लक्षित घटकांसोबत काम करण्यासाठी वहिदा नैनार आणि डॉ. विभूती पटेल यांच्या नेतृत्वाखालील महिला शैक्षणिक संशोधकांच्या गटाने हे सुरू केले आहे. धारावी प्रकल्प हा धारावीमधील कचरा वेचक/कचरा गोळा करणारे आणि त्यांच्याकुटुंबांच्या कल्याणासाठी अउडफ्ठ फाउंडेशनने सुरू केलेला एक उपक्रम आहे. ACORN ने हाती घेतलेल्या पहिल्या प्रकल्पांपैकी एक म्हणजे धारावी परिसरातील तरुण पुनर्वापर करणारे/कचरा गोळा करणाऱ्यांच्या जीवनावर एक माहितीपट तयार करणे. वेस्ट हा चित्रपट पराशर बरुआ यांनी दिग्दर्शित केला होता आणि गेल्या १० वर्षांत मुंबईतील ७५ हून अधिक महाविद्यालये, शाळा आणि संस्थांमध्ये प्रदर्शित झाला आणि १,००,००० लोकांनी तो पाहिला.

संशोधन आणि क्षेत्रीय कार्य केल्यानंतर, ACORN ने २००९ मध्ये स्वतःच्या संसाधनांनी धारावी येथे एक सामुदायिक केंद्र सुरू केले. अकरा वर्षे जुने हे केंद्र आता वांद्रे-सायन लिंक रोडवरील टी-जंक्शन परिसरात स्थलांतरित करण्यात आले आहे. ते समुदायासाठी कार्यालय, पुनर्वापर केंद्र, ग्रंथालय, स्टुडिओ, नावीन्यपूर्ण प्रयोगशाळा आणि शाळा म्हणून काम करते. ACORN आज मुंबईतील अनेक शाळा आणि कार्यालयांमधून जसे की द अमेरिकन स्कूल ,द धीरूभाई अंबानी स्कूल (द ओबेरॉय इंटरनॅशनल स्कूल, द जर्मन स्कूल) आणि ब्लूमबर्ग, मार्श इन्शुरन्स, अमेझॉन इत्यादी कॉर्पोरेट्समधून सुका कचरा गोळा आणि पुनर्वापर करते. काही वर्षांतच, कल्याणकारी उपक्रमांसोबतच, ACORN ने धारावी समुदायातील मुलांसाठी आणि तरुणांसाठी एक अनौपचारिक शिक्षण प्रकल्प सुरू केला आहे.

भूगोल, इंग्रजी, इतिहास, संगीत, हस्तकला, नृत्य आणि नाटक या विषयांमध्ये वर्गखोलीचे उपक्रम आयोजित केले जातात. केंद्रात संगणक साक्षरता वर्गांसाठी एक इनोव्हेशन लॅब देखील स्थापन केली आहे.

१२ ते २५ वयोगटातील मुले समाजातील सर्वात दुर्लक्षित आणि वंचित घटकांपैकी आहेत. त्यापैकी बरेच जण अगदी लहानपणापासूनच त्यांच्या कुटुंबासाठी कमावणारे आहेत. त्यांच्या आउटरीच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ACORNअनेक शैक्षणिक, संशोधक, कलाकार, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आणि विद्यापीठे आणि शाळांमधील स्वयंसेवकांचे आयोजन देखील करते.

ACORN जगभरातील अनेक संशोधक आणि माहितीपट प्रकल्पांचा विषय राहिला आहे. ACORN धारावीच्या तरुणांना त्यांच्या भविष्यातील नोकऱ्या आणि करिअरसाठी तयार करण्यासाठी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देखील देत आहे. ACORN च्या वर्गात जाणारे आणि ACORN च्या मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होणारे १५० मुले आणि मुली वेगवेगळ्या आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमीतील आहेत. ही मुले १० ते २५ वयोगटातील आहेत आणि समाजातील सर्वात दुर्लक्षित आणि वंचित घटकांपैकी आहेत. यापैकी अनेक मुलांना, लहान वयापासूनच, काम करावे लागले आहे आणि त्यांच्या कुटुंबासाठी कमावणारे बनले आहे.

■ ■ ■ ■ ■

लोकजागर

## सिम कार्ड विकणारा तरुण ८ हजार कोटींच्या कंपनीचा मालक



ओयो रूम्सचे संस्थापक रितेश अग्रवाल यांची यशोगाथा पाहिली तर दिल्लीच्या रस्त्या रस्त्यांवर सिम कार्ड विकून पैसे मिळवणाऱ्या या तरुणाने अखंड मेहनत आणि परिश्रमाच्या जोरावर आज भारतातच नव्हे तर जगातील जवळपास ८० देशांतील ८०० शहरांमध्ये हॉटेल व्यवसाय उभारला असून अब्जावधी डॉलरची संपत्ती उभी केली आहे.

१६ नोव्हेंबर १९९३ रोजी ओरिसा राज्यातील कटक येथील बीसम या ठिकाणी एका सामान्य मारवाडी कुटुंबामध्ये रितेश अग्रवाल यांचा जन्म झाला. इतर आई-वडिलांप्रमाणे त्यांच्या देखील आई-वडिलांची इच्छा होती की मुलाने चांगले शिक्षण घ्यावे व हीच आई-वडिलांची इच्छा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात रितेश हे असताना मात्र त्यांना उद्योजक व्हायची इच्छा मनामध्ये तीव्र स्वरूपात होती.शिक्षण घेत असताना ते शिक्षणासाठी दिल्लीला गेले व त्या ठिकाणी इंडियन स्कूल ऑफ बिझनेस अकॅडमीमध्ये ॲडमिशन घेतले. परंतु मनात उद्योजक होण्याचे सुरू असल्याने शिक्षणात मन रमले नाही व त्यांनी ते अर्धवट सोडले. त्यानंतर देखील घरच्यांनी आयआयटीच्या प्रवेशाची तयारी करिता त्यांना कोट्याला पाठवले परंतु रितेश अग्रवालने दिल्लीच्या रस्त्यांवर सिम कार्ड विकण्याला प्राधान्य दिले. २०१२ या वर्षी पूर्वीच ओरिव्हल स्टेज नावाचे एक स्वतःचे स्टार्टअप सुरू केले. परंतु हा स्टार्टअप यशस्वी झाला नाही. त्यामुळे दिल्लीला परत यावे लागले.

यावेळी मात्र फक्त तीस रुपये खिशात शिल्लक होते. काहीतरी उद्योग धंदा करावा हे आधीपासून मनात असल्यामुळे खिशात एक रुपया देखील नसताना सिम कार्ड विकायला सुरुवात केली. २००९ मध्ये डेहराडून आणि मसुरीला फिरायला गेलेले असताना त्या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य पाहून ते मंत्रमुग्ध झाले. एकाच प्लॅटफॉर्म लोकांना परवडणाऱ्या किमतीत सर्व प्रकारच्या सुविधा दिल्या जाऊ शकतात.

या माध्यमातून लोकांना हवे त्या ठिकाणाची माहिती घेणे सोपे होईल व नवीन ठिकाणांना त्यांना भेट देता येणे शक्य होईल व या माध्यमातूनच रितेश अग्रवालला भविष्यातील त्यांचा हा व्यवसाय सापडला. २०१३ मध्ये रितेश अग्रवाल यांची थील फेलोशिप करता निवड झाली व ७५ लाख रुपये मिळाले. या पैशांमधून रितेश यांनी ओयो रूम सुरू केल्या. या प्लॅटफॉर्मच्या सहाय्याने स्वस्त दरात हॉटेल बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली. आज जगभरात वेगाने जे काही व्यवसाय वाढत आहे त्यामध्ये त्यांच्या ओयो देखील आहे. काहीही करण्याची तयारी असली आणि त्यासाठी लागणारे कष्ट मनापासून करण्याची तयारी आपल्याला यशा पर्यंत पोहोचवू शकते हे रितेश अग्रवाल यांच्या उदाहरणावरून आपल्याला दिसून येते. ■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## डॉक्टरने भररस्त्यात स्वतःला पेटवून घेतले

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. ९ :** एका उच्च शिक्षित व्यक्तीने भर वाहतुकीच्या मार्गावर स्वतःला पेटवून घेतले. यावेळी उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवून आग विझविली असली तरीही त्या डॉक्टरची प्रकृती गंभीर असून तो उपचारदरम्यान मृत्यूशी झुंज देत आहे.

नांदुरा ते जळगाव जामोद मार्गावर हा थरारक अन तितकाच दुर्दैवी घटनाक्रम घडला. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा ते जळगाव या रस्त्यावरील आलमपुर फाट्यावर आज नेहमीप्रमाणे प्रवासी, प्रवासी वाहतूक करणारी वाहने, फाट्यावरील लहान सहान दुकानें ग्राहकांनी गजबजलेली होती. दररोज प्रवास (अप डाऊन) करणारे कर्मचारी, कामगार, विद्यार्थी याने आलमपूर फाटा गर्दीने फुलला होता.

या दैनंदिन धामधूमीत तिथे आलेल्या एका व्यक्तीने सोबत आणलेले ज्वालाग्रही (पेट्रोल) द्रव्य पदार्थ स्वतःच्या अंगावर ओतून घेतले. यामुळे तो उभा पेटला. कुणाच्या ध्यानीमनी नसताना अचानक झालेल्या अभूतपूर्व प्रकाराने उपस्थित गावकरी, प्रवासी थक्क झाले.

दरम्यान काही धाडसी गावकर्यांनी हिम्मत दाखवून उभ्या पेटलेल्या व्यक्तीच्या अंगावर पाण्याचा मारा केला. त्यामुळे काही वेळाने आग विझली. मात्र तोपर्यंत तो इसम गंभीर रित्या भाजल्या गेला. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

## अकोला येथे गुरुपौर्णिमा महोत्सव

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. ९ :** सनातन संस्थेच्या वतीने आज १० जुलै रोजी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे जानोरकर मंगल कार्यालय, रिंग रोड, केशव नगर, अकोला येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात महर्षी व्यास आणि गुरूंची प्रतिमा यांचे पूजन, राम राज्य स्थापनेसाठी नामजप, सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा संदर्भात लघुपट, महिलावर्गाने समाजविरोधी तत्त्वापासून स्वतःचे रक्षण कसे करावे याबाबत स्वसंरक्षण प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके तसेच राष्ट्रधर्म रक्षणार्थ साधना आणि युद्धकाळातील आपली कर्तव्ये या विषयावर व्याख्यान होईल.

सनातन संस्थेद्वारा प्रकाशित साधना, राष्ट्रधर्म, धर्माचरण, संस्कृती रक्षण व सण व्रते शास्त्रीय दृष्ट्या कसे साजरी करावे याबाबत ग्रंथ प्रदर्शनी लावण्यात येत आहे.

संस्थेद्वारानिर्मित सातवी उत्पादने यांचे प्रदर्शन, आपत्काळात प्रथमोपचाराची सिद्धता याबाबत प्रदर्शन, देव्हाऱ्यातील देवांची मांडणी व पूजेची सिद्धता कशी असावी? याबाबत देखावा, श्री गणेशाची सात्विक मूर्ती, सनातन संस्थेद्वारा प्रकाशित दैनिक साप्ताहिक वृत्तपत्र यांचे प्रदर्शन, शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

असे विविध आध्यात्मिक सांस्कृतिक व राष्ट्र रक्षणासंदर्भात प्रबोधन करणारी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व जिज्ञासू, हितचिंतक, वाचक व धर्मप्रेमी यांनी महोत्सवात सहभागी होऊन राष्ट्र आणि धर्म याबाबत आपले कर्तव्य बजावावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तत्कालीन डीएसओ निकाळजे यांना बडतर्फ करा..

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ९ :** भंडारा जिल्ह्याच्या तुमसर विभागात अवैध वाळु साठेबाजी प्रकरणी नागपुरच्या विभागीय आयुक्तांनी (महसुल) केलेल्या चौकशीत उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे दोषी आढळून आले आहेत. ते भ्रष्टाचारात लिप्त असल्याचा ठपका ठेवून निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान निकाळजे हे परिविक्षाधिन कालावधीत गडचिरोली येथे प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत असतांना जिल्ह्यातील सिएमआर मिलींग गैरव्यवहार प्रकरणाशी त्यांचेही तार जुळले असल्याचे समोर येऊ लागले आहे.या गैरव्यवहारातुन शासनाची कोट्यावधी रुपयाचे नुकसान केले असल्याने निकाळजे यांचेकडून नुकसानीची वसुली करुन त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करावी तसेच त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात पणन हंगाम-२०२१-२२ व २०२२-२३ मध्ये मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स सोबत तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी संगनमत करून धान खरेदी केंद्रापासून जवळच्या राईसमिलला भरडाईकरीता धान देण्याऐवजी दुर अंतरावरील राईसमिलला भरडाईचे काम दिले. तसेच भरडाई केलेला तांदूळ जमा करतांना जवळचे शासकीय गोदाम सोडून दूर अंतरावरील गोदामात तांदूळ जमा करण्याचे आदेश दिले. धान व तांदूळ वाहतुकीत प्रचंड गैरव्यवहार करून शासनाचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान केले.

त्यांनी आपल्या सेवाकाळात जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यातील देलनवाडी व कुरंडी या शासकीय धान खरेदी केंद्रावरील धान लगतच्या आरमोरी व देसाईगंज तालुक्यात सिएमआर मिलींग करणारे राईसमिल असतांना पदाचा दुरुपयोग करून जवळपास २५० किलोमीटर लांब दुर अंतरावर असलेल्या सिरोंचा तालुक्यातील रामानुजपुर येथील नारायण ॲग्रो इंडस्ट्रीजला भरडाई करीता देऊन तसेच इतर राईसमिलच्या बाबतीत असेच प्रकार करून धान वाहतुकीत शासनाच्या कोट्यावधी रुपयाचे नुकसान केले आहे.

हंगाम २०२२ -२३ मध्ये भरडाई केलेला तांदुळ जमा करतांना नारायण ॲग्रो इंडस्ट्रीज रामानुजपुर ता.सिरोंचा यांच्या जवळचा चामोर्शी येथील गोडाऊन सोडुन लांब दुर अंतरावरील शासकीय गोडाऊन आरमोरी व टीडीसी गोडाऊन आरमोरी येथे तांदुळ वाहतुक करून जमा करण्यात आला. साई राईसमिल एटापल्ली व श्री दत्त राईसमिल कुनघाडा व हनुमान राईसमिल कुनघाडा यांच्या जवळचा चामोर्शी गोडाऊन सोडुन लांब अंतरावरील शासकीय गोडाऊन आरमोरी, गजानन राईसमिल नान्ही ता. कुरखेडा यांचे गोडाऊन सोडून शासकीय गोदाम आरमोरी, श्यामसुंदर राईसमिल कुरखेडा यांच्या जवळचा कुरखेडा येथील गोडाऊन सोडुन आरमोरी व देसाईगंज येथील शासकीय गोदामात, अन्नपुर्णा राईस अँड ॲग्रो बोदली तसेच लक्ष्मी राईसमिल शिवणी यांच्या जवळचा गडचिरोली गोडाऊन सोडुन शासकीय गोडाऊन आरमोरी ,माहेश्वरी ॲग्रो इंडस्ट्रीज अमिर्झा ता. गडचिरोली यांच्या जवळचा गडचिरोली गोडाऊन सोडुन लांब दुर अंतरावरील शासकीय गोडाऊन कुरखेडा येथे तांदुळ जमा करण्यात आला.मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज वडसा यांच्या जवळचे वडसा गोडाऊन सोडुन शासकीय गोडाऊन कुरखेडा व शासकीय गोडाऊन गडचिरोली, तसेच महालक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज वडसा, मारोती फुड इंडस्ट्रीज वडसा,विशाल राईसमिल कुरुड, शारदा फुड प्रॉडक्ट कुरुड,सार्थक राईसमिल शिवराजपुर यांच्या जवळचा शासकीय गोडाऊन वडसा सोडुन शासकीय गोडाऊन कुरखेडा तसेच विशाल राईसमिल कुरुड, सार्थक राईसमिल शिवराजपुर, जय अम्बे राईसमिल कुरुड, मायाश्री फुड इंडस्ट्रीज वडसा यांचा जवळचा शासकीय वडसा गोडाऊन सोडुन शासकीय गोडाऊन गडचिरोली येथे तांदूळ जमा करून तांदूळ वाहतुकीत प्रचंड भ्रष्टाचार करून शासनाच्या कोट्यावधी रुपयाचे नुकसान केले.

निकाळजे यांच्या सेवाकाळात गडचिरोली जिल्ह्यातील सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स सोबत संगनमत करून जवळपास सर्वच राईसमिल सोबत असेच प्रकार करीत शासनाचे नुकसान केले. तत्कालिन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे हे परिविक्षाधीन कालावधीत गडचिरोली येथे कार्यरत असतांना सिएमआर मिलींग वाहतुक घोटाळ्यात लिप्त असल्याने त्यांनी कोट्यवधीची माया जमविली असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे निकाळजे यांचेकडून झालेल्या नुकसानीची वसुली करुन त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी, अशी मागणी कऱ्हाडे यांनी तक्रारीतून केली आहे.